# संघटीत होण्याची वेळ आणि चिन्ह

शुभ संध्याकाळ. आजच्या रात्री येथे ह्या जागी उभे राहणे हे सौभाग्य आहे.

2 मी, आजच्या सकाळी, रस्त्याने खाली येताना...मी प्रार्थना करीत, प्रभूची वाट पाहत होतो. आणि रस्त्यावरून खाली येताना मी अ—अ रेडीओ चालू केला, ज्यावर कृष्णवर्णीय भाऊ स्मिथ, जे रेडीओच्या माध्यमाने सेवा करतात, (तुमच्यांतील कोणी त्यांना आज सकाळी ऐकले काय? कोणी एकाने तरी?) वर, मला वाटते ओहिओ येथे. कोणीतरी मला त्यांच्या प्रचाराविषयी सांगत होते, आणि म्हणाले, "तुम्ही त्याला बोलताना ऐकायला हवे, तशा प्रकारे."

3 आज सकाळी, मला त्याला ऐकण्याची संधी मिळाली. आणि ते खरोखरच सांगत होते कि कशाप्रकारे आज जगामध्ये पाप वाढत आहे, आणि तो...आणि मी त्या प्रसारणकेंद्रापासून, थोड्या पुढे गेलो, आणि दुसरे प्रसारणकेंद्र ऐकू लागलो. ज्यावेळी मी येथे खाली आलो, मी ह्याविषयी तयार होतो कि मी येथे चर्चमध्ये येण्यास जास्त उशीर तर नाही लावला. तर मग, आपण खरोखरच खूप भाग्यवान आहोत, कि आजच्या रात्री आपल्याला येथे प्रभूच्या सभेमध्ये सेवा करण्याची संधी मिळाली आहे.

4 आणि भाऊ नेविलविषयी बोलायचे, आणि त्या दिवशीचा संदेश, जो ह्या छोट्या स्त्रीसाठी होता, जी आताच आपल्यामधून निघून गेली आहे. ती, आपणा सर्वांना माहीत आहे कि, ती बहिण वेवर होती. आणि मी विचार करीत होतो, एका मनुष्याविषयी, ज्याचा आज रात्री बाप्तिस्मा होणार आहे; ती...मी तिला ह्या डोहामध्ये बाप्तिस्मा दिला होता जेव्हा मी...त्यांना, तिला एका चाके असलेल्या खुर्चीवर बसवून आणावे लागले होते. ती कर्करोगामुळे, मृत्युच्या जबड्यात होती, आणि तिच्याकडे जगण्यासाठी केवळ ती एकच रात्र होती; डॉक्टरांनी तिच्यावरील आशा सोडली होती, ती दुसऱ्या दिवशी सकाळी मरणार होती. आणि मी तिच्या घरात गेलो आणि तिच्याबरोबर दिव्य आरोग्याविषयी बोलण्याचा प्रयत्न केला, आणि ती पुनःपुन्हा एकच गोष्ट बोलत होती, "तुम्ही माझ्या छताखाली यावे इतकी माझी लायकी नाही." ती म्हणाली, "देवाच्या एका सेवकाने माझ्या घरात यावे इतकी मी लायक नाही." ती म्हणाली, "मी एक पापी आहे." पण तिने म्हटले, "महाशय, मला ह्याप्रकारे मरायचे नाहीये." आणि मग, ग्रेस वेबर, ज्या येथे आहेत, त्यांनी मला तेथे नेले होते. मी नुकताच, सभेमधून थकून आतमध्ये आलो होतो, आणि तेथे जेव्हा मी तिच्यासाठी प्रार्थना केली, आणि तिच्यासाठी वचन वाचले, आणि ती वाचली गेली. त्यावेळी, ती महत्प्रयासाने केवळ तिचा हात उचलू शकत होती, पण तिला सगळ्यांबरोबर हस्तांदोलन करायचे होते. ती केवळ...तिला काहीतरी झाले.

5 आणि ते हस्तांदोलन करीत होते, त्यावेळी, मी तिच्याविषयी एक दृष्टांत पहिला ज्यामध्ये ती एका कोंबडीच्या खुराड्याकडे जाऊन, परत येत होती. मी म्हटले, "ठीक आहे, आता हे ठीक होणार आहे." आणि हे अठरा वर्षापूर्वी घडले. आणि त्यावेळेपासून नेहमी, ती त्या कर्करोगापासून एक उडी पुढे होती. जर ती मरण पावली,...तर ती कोणत्याही कर्करोगाने नव्हे, तिला हृदयविकाराचा झटका आला आणि त्याने तिला मारले. त्यांनी तिला ऑक्सिजनखाली ठेवले होते; ती एका हृदयविकाराच्या झटक्यामुळे मरण पावली.

6 आणि मी अगदी शेवटी विचार करत होतो जेव्हा लोक बाहेर जात होते, आणि ते गात होते, *मग येशू आला*. अगदी बरोबर तसेच झाले, तो आला आणि त्या अठरा वर्षांसाठी तिला जीवन दिले. आणि मी विचार केला, किती योग्य आहे. त्या स्त्रीला कदाचित माहीत नसेल कि त्याप्रमाणे ती जगेल. तर मग पुन्हा, तिला हे माहीतही नव्हते कि असे घडेल. परंतु हे किती सुयोग्य असे तिच्याविषयी घडले, *मग येशू आला*.

7 आता हे थोडेसे अगोदर आहे, मला आशा आहे कि, माझ्या सभेसाठी सर्वकाही सज्ञ आहे. मी खूप चिंताग्रस्त होतो. आजच्या सकाळी, मी खूप गोंधळात होतो, मी वर प्रार्थना करण्यासाठी गेलो होतो. आणि आता मी—मी पुन्हा येथे, घरी परतलो आहे. माझे कुटुंब, त्यांना मी ॲरिझोना येथे घेऊन गेलो, आणि मी...कि मुले शाळेत जातील. आणि मी येथे परत आलो की थोडी विश्रांती घेण्यासाठी, आणि येणाऱ्या आठवड्यात, भाऊ वूड व इतर भावांसोबत; बाहेर जाऊन शिकार करण्यासाठी. आम्ही खाली केंटकी येथे जात आहोत. आणि मी...मी अशा वेळी येथे आलो कि...कि ज्यावेळी बहिण वेवर मरण पावली, आणि हे अगदी बरोबर होते कि मी येथे असावे आणि भाऊ नेविलला अंत्यविधीसाठी मदत करावी.

8 आणि मी प्रयत्न करत नाही...मी ह्याविषयी खूप जास्त सांगण्याचा प्रयत्न करत नाही, तुम्हाला माहीत आहे, लोकं तक्रार करतात. कारण, मला वाटते, सगळ्यात भयानक गोष्टींपैकी एक हि आहे कि एखाद्या मनुष्याला किंवा स्त्रीला पाहावे, जे नेहमी तक्रार करत असतात. मी नेहमी विचार करतो, "देवा, मला त्यापासून दूर ठेव." पाहा, त्यामुळे—त्यामुळे विश्वास कमजोर होत राहतो, तुम्हाला माहीत आहे. तुम्ही केवळ—तुम्ही केवळ... जर तुम्ही—जर तुम्ही...मला माहीत आहे जसजसे ते वृद्ध होत जातात, आपल्यांतील प्रत्येकजण, आपल्याला काहीनाकाहीतरी होत राहणार. आणि मला माहीत आहे त्या छोट्याछोट्या गोष्टी साठत जातात, जसजसे तुम्ही वृद्ध होत जाता, हे होते साहजिकच आहे. पण मला वाटते, सैतान करत असलेल्या भयानक गोष्टींपैकी, एक हि आहे कि, एखाद्या व्यक्तीच्या जीवनाचा ताबा घेणे; एक हेकेखोर वृद्ध मनुष्य किंवा एक वृद्ध बाई, तुम्ही पाहा. मी—मी आशा करतो कि मी त्या जागी जाणार नाही. मी आशा करतो कि मी, माझे ओझे सहन करू शकेन, आणि—आणि एका अशा जागी असेन जेथे...मला माझ्या जीवनाला देवाच्या गौरवाचा मुकुट घालायचा आहे: त्याची सहनशीलता, सौम्यता, शांती, लीनता आणि पवित्र आत्म्याने भरणे.

9 आणि मी...माझ्या आयुष्यामध्ये ज्या गोष्टींनी मी दुःखित झालो, त्यांच्यातील सर्वात महत्वाची गोष्ट, माझी चिताक्रांत अवस्था हि आहे. असे कि मी इतका जीर्ण होतो, कि माझी खरोखर दमछाक होते. मला...अशा प्रकारची भावना होते कि कोणीही माझी पर्वा करीत नाही, तुम्हाला माहीत आहे, आणि—आणि तुम्ही सर्व...तुम्हालासुद्धा, तशी भावना येते. आणि मला हे खरोखर खूप जास्त प्रमाणात होते, आणि कधीकधी ते खूप तीव्र होते, आणि मी क्वचितच काही करू...तो तणाव आहे, आणि तोच हे करतो. आणि मी अशा एका अवस्थेत जातो कि अनेक वेळा, विशेषकरून खूप अधिक अशा दृष्टान्तांमुळे, त्यांचा माझ्यावर प्रभाव होतो. मी एखाद्या व्यक्तीकडे पाहतो, आणि विचार करतो, "हा एक दृष्टांत आहे. नाही, नाही, नाही हा नाही. होय! हा नाही काय?" तुम्ही पाहिले? आणि तुम्हाला खरच समजू शकत नाही कि हे किती अवघड आहे. आणि मग—आणि मग तुम्ही—तुम्ही आश्चर्य करता. मग नंतर तुम्ही विचार करू लागता कि, "बरे तुम्ही..." नंतर तुम्ही थोडे बाजूला होऊन म्हणता, "बरे, आता, मी काय केले आहे? मी येथे आहे, मी—मी पन्नास वर्षांचा आहे आणि मी प्रभूसाठी काहीच केले नाही; आणि मी—मी म्हातारा होत आहे. आणि काय...? अरे बापरे." आणि मग तुम्हाला दुःखी भावना होते...ज्याला

आपण “निराश होणे” असे म्हणत असू. तुमच्यांतील काही भाऊ जे माझ्या वयाचे आहेत त्यांना आठवत असेल आपण “निराश होणे” कशाला बोलत होतो. माझे पप्पा त्याविषयी बोलत असत आणि मी विचार करायचो कि ते काय म्हणत आहेत, आणि आता मला नक्की माहीत आहे कि ते काय म्हणत होते. तर मग नंतर तुम्हाला अशी भावना होते जे, त्याच्यातील काहीच खर नाहीये; ते केवळ तुम्ही, तुम्हाला माहीत आहे. पहा, तुम्हाला माहीत आहे, ते केवळ तुम्ही आहा जे हे करत असता.

10 त्यामुळे मी आता स्वतःला थोडेसे शांत करण्याचा प्रयत्न करत होतो, आणि स्वतःला तयार करत होतो, त्या—त्या मोठ्या धक्क्यासाठी जो लवकरच येत आहे अशी मी आशा करतो. आणि नंतर...मला लगेच न्यूयॉर्क येथे जाणे आहे, आणि मी...तेथे वर एका सभेसाठी, एका मोहिमेमध्ये. आणि मग खाली श्रेवपोर्ट येथे आणि मग फीनिक्स येथे परत जाणे आहे. आणि मग पश्चिमेच्या भोवती येणे आहे...सयुंक्त राष्ट्रांच्या दक्षिण सीमेवर. आणि मग ते समुद्रापलीकडच्या दौऱ्याची तयारी करत आहेत, जो वर्षाच्या सुरुवातीला बहुतेक मार्च, एप्रिल मध्ये शक्य तेवढ्या लवकरात लवकर चालू करणे आहे; ह्या पुढच्या दौऱ्यात शक्य झाले तर आम्ही स्टॉकहॉल्म किंवा ऑस्लो येथून सुरुवात करून मग नंतर जगभर जाऊ.

11 आणि आता मी घरी आहे, एका प्रकारे थोडीशी विश्रांती घेत आहे, एका प्रकारे स्वतःमध्ये आणि शक्ती पुन्हा स्थापित होण्यासारखी स्थिती आहे. आणि जर प्रभूची इच्छा असेल, तर मी पुढच्या रविवारी केन्टकीला परत येईन. आणि जर हे ठीक आहे, प्रभूला आवडेल, आणि भाऊ नेविलला काही हरकत नसेल; तर बरे, मी पुढच्या रविवारी सभा घेण्याचा प्रयत्न करीन. आणि जितके भाऊ नेविल इच्छित आहेत, तितकेच त्यानेही इच्छिले, तर मी—मी येथे असेन. होय महाशय, त्याने केवळ...जर त्याने ह्याविषयी भाऊ नेविलइतकेच इच्छिले असेल तर. मी आशा करतो कि तो इच्छित आहे. आता, पाहा, मग मला माहीत आहे कि मी लवकरच, जर प्रभू इच्छित असेल, मी थोड्या वेळासाठी तुमच्यापासून निघून जाईन.

12 आणि मी...केवळ छोटा संदेश, जसे माझ्या हृदयात थोडे काही आहे, ते मला—मला—मला तुमच्यापुढे व्यक्त करावेसे वाटते, तुम्ही पाहा, आणि आपण त्यावर सहभागीता करू शकू. आता, माझ्याकडे त्यांचातील काही आहेत, पाच किंवा सहा जे अगदी काही दिवसांपूर्वी माझ्याकडे आले. आणि मी येथे दोन दिवसांसाठी मोठया खारीची शिकार करण्याकरिता गेलो होतो. आणि मी जंगलात जातो आणि माझ्यासोबत पेन्सिल व कागद घेतो. पाहिले? आणि काही वेळासाठी चांगले वातावरण आणि सूर्यप्रकाश असतो, मी एखाद्या झाडाला लागून आधार घेतो. जर मी झोपी गेलो नाही, तर मी प्रार्थना करण्यास सुरुवात करतो, आणि मग प्रभू मला काहीतरी देतो, मी त्याची टिपण्णी करण्यास सुरुवात करतो, तुम्ही पाहा. तुम्हाला माहीत आहे मला काय सांगायचे आहे; जेव्हा तुम्ही स्वतःमध्ये येता, आणि मग तुम्ही...मग येथे मी मध्ये येतो, आणि ते सर्व कागदांच्या संग्रहावर लिहून काढतो. आणि मग जेव्हा मला बोलाविण्यात येते, मी धावत बाहेर जातो आणि माझा संग्रह आणतो आणि त्याच्यामध्ये बघतो आणि विचार करतो कि मी कुठून सुरुवात करू शकतो, तुम्ही पाहा. अगदी हेच आता घडले.

13 तर आता, जर प्रभूची इच्छा असेल तर, मला थोडे बोलायचे आहे...मी हे मोठे–मोठे संदेश, ज्यासाठी तुम्हाला बरेच तास लागतात; ते छोटे करण्याचा प्रयत्न करतो. आणि प्रभुने काल रात्री शिकागो येथे, मला खूप थोडक्यात अगदी तीस मिनिटांत सांगण्यास मदत केली. आणि कोणीतरी येऊन मला सांगितले, “मला वाटत नव्हते कि तू असे करू शकशील, पण तू केले!” म्हणजे दोन ते अडीच तासावरून अगदी तीस मिनिटे, तुम्ही

समजू शकता. तर मग कदाचित आज रात्री मी थोडीशी घाई करू शकेन आणि तुम्हाला जास्त वेळ थांबवून न ठेवण्याचा, सराव करीन.

14 देव तुम्हाला आशीर्वादित करो. तुम्ही कोठेही जा, तेथे ह्यासारखे प्रार्थनामंदिर नसेल. हे घर आहे, सुंदर घर. आणि मला वेवर परिवाराबद्दल सहानुभूती आहे. आणि हे मौल्यवान, वर्णीय भाऊ, जे मरण पावले, ते जाण्याअगोदर, मी त्यांच्यासोबत थोडावेळ प्रार्थना केली, आणि खरोखर ते एका चांगल्या चरित्राचे भाऊ होते. आणि ते आता देवाबरोबर आपल्या घरी आहेत आणि आता हे सर्व संपले आहे. आणि तुम्हाला कसेही करून जाणे आहे, आणि आपणा सर्वांना हे ठाऊक आहे. तर आपण…प्रभू त्यांच्या आत्म्याला शांतीमध्ये विसावा देवो, आणि आपण अपेक्षितो की एके दिवशी आपण त्यांच्या सहभागीतेत असू, त्या पलीकडच्या प्रदेशात जेथे आजार, दुःख, किंवा मरण नाही. तोपर्यंत, आपण केवळ सुवार्तेसाठी शक्य तितके करूया.

15 तणावाबद्दल बोलायचे झाले, तर आज सकाळी मी त्याविषयी प्रार्थना करत होतो. जर तुम्हाला ताणतणाव नसला असता तर तुम्ही काय केले असते? फक्त ह्याविषयी विचार करा. ताणतणाव हा जीवनाचा भाग आहे. मी असा विचार केला तेव्हा एक प्रकारे त्यामुळे मला प्रोत्साहन मिळाले. जर तुम्हाला तणाव नसता, तर तुम्ही एखाद्या कपड्याच्या बाहुलीप्रमाणे असता, तुम्हाला कोणत्याच भावना नसत्या. असे काहीच नसते ज्यावर तुम्ही काम करू शकाल. एखाद्या पती आणि पत्नीप्रमाणे, कदाचित जर तिला काहीतरी करायचे असेल, आणि ते एकत्र काम करण्याचा प्रयत्न करतात (विशेषकरून ख्रिस्ती), आणि दुसऱ्याला काहीतरी करायचे आहे…आणि मग तुम्ही एकत्र येता…तुम्हाला कळते तिने काय केले आहे; तिला कळते…पाहा, तणाव तुम्हाला एकत्र जवळ आणतो. आणि कोणीतरी तुम्हाला सांगते, "बरे," सांगतात, "फक्त त्या बिचाऱ्या पत्नीचा विचार कर जी, तू बरा नव्हता तेव्हा खूप जास्त तणावामध्ये होती, किंवा तो पती जेव्हा तू बरी नव्हतीस, तेव्हा खूप तणावामध्ये होता. आणि मग जेव्हा सर्वकाही माफ केले जाते, पाहा तुम्हाला त्याच्याविषयी कसे वाटते. ओह, खरोखर तुम्हाला फक्त…" पाहिले तुम्हाला तणाव असायलाच हवा. बस्स.

16 आणि भावनांविषयी विचार करा, जर तुम्हाला कोणतीच भावना नसती तर, काही त्रास नाही किंवा काहीच नाही? जर कोणता त्रासच असला नसता तर? तुम्हाला कोणतीच भावना नसती. पाहिले? आणि जर तुम्हाला भावना नसती, तर तुमचे एक ज्ञानेंद्रिय नसले असते. समजले? तर, पाहा, कसेही असले तरी सर्वकाही चांगलेच आहे. तर, "देव केवळ आपल्याला ह्या सर्वापुढे उभे राहण्यासाठी कृपा देतो," हेच आहे. आपण जर केवळ त्या कृपेद्वारे उभे राहू, आणि तेथे उभे राहून म्हणू, "आम्हाला माहीत आहे कि जेव्हा हे जीवन संपेल, तेव्हा त्या दुसऱ्या बाजूला एक महान जीवन आहे ज्याकडे जाण्यास आम्ही पाहत आहोत." आणि आता, आपण—आपण लक्षात घ्या कि ह्या सर्व गोष्टी, तो एक तणाव आहे.

17 काही लोकं ख्रिस्ती जीवनाचा अशा प्रकारे परिचय देण्याचा प्रयत्न करतात, की "तुम्ही चिंतेपासून मुक्त आहात. तुम्ही…" नाही, तुम्ही नाही. "तुम्ही तणावापासून मुक्त आहा." असे, नाही! तुम्ही जेव्हा खिस्ती होता तेव्हा तुम्हाला जास्त तणाव येतो, कारण तुम्ही एक चिंतामुक्त मनुष्य होता, जे आनंदी आणि स्वछंदी असे होता, जे काही तुमच्यापुढे आले, ते तुम्ही कोणतीही काळजी न करता करीत होता.

18 पण, जेव्हा तुम्ही खरे ख्रिस्ती बनता, तेव्हा प्रत्येक क्षणी तुम्ही विचार करता, "मी माझ्या प्रभूला संतोषवित आहे काय? जर मला त्यापासून कळाले असते!" हे तुम्हाला

तणावामध्ये आणते, तुम्हाला सतत काळजी घेण्यास लावते. हेच तुम्हाला, जे तुम्ही आहा तसे घडविते. तर मग एकंदर, तणाव हा एक आशीर्वाद आहे. केवळ तुम्ही त्याकडे कसे बघता त्यावर अवलंबून आहे. केवळ तुम्ही त्याकडे कसे बघता त्यावर अवलंबून आहे. समजले? जर तुम्ही केवळ दुसरी बाजू बघितली, तेथे—तेथे आहे…पाहा, तुम्ही एखादी गोष्ट कितीही बारीक कापली, तरी तिला दोन बाजू असतात. त्यामुळे तुम्ही दोन्ही बाजू बघणे गरजेचे आहे.

19 तर तणाव…मला वाटते, "अरे बापरे, हा…हा तणाव काय आहे? जर मी ह्या तणावाविरहीत जन्मलो असतो तर." बरे, जर मला हा तणाव नसला असता, तर जो मी आहे तसा नसलो असतो. कदाचित, मी ख्रिस्तीच असलो नसतो. हा तणाव होता ज्याने मला येशू ख्रिस्ताकडे आणिले. पाहिले? तर, मग हा माझ्यासाठी एक आशीर्वादाच्या गोष्टीसारखा आहे.

20 तर मग जसे पौलाने म्हटले, जणू काही, जेव्हा त्याला तणाव आला किंवा असे काही, त्याने तीन वेळा तो दूर करण्यासाठी प्रभुशी सल्लामसलत केली. आणि प्रभुने म्हटले, "शौला, माझ्या…पौला, माझी कृपा तुझ्यासाठी पुरेशी आहे."

21 तो म्हणाला, "मग, मी माझ्या दुर्बलतेत गौरव करीन. मग जेव्हा मी अशक्त आहे, तेव्हा मी सशक्त आहे." पाहिले? जोपर्यंत हे देवाच्या इच्छेप्रमाणे आहे, तोपर्यंत सर्व ठीक आहे.

22 आता, मी एकदा त्याच्याशी सल्लामसलत केली जेव्हा ह्याने मला इतका त्रास दिला, कि त्यामुळे मला भीती आली. आणि त्याने मला म्हटले, जवळजवळ आठ किंवा दहा वर्षांपूर्वी, त्याने म्हटले, "ते पुन्हा तुला भीती देणार नाही." आणि त्याने पुन्हा तसे केले नाही. नाही महाशय; त्याविषयी चिंता करू नका. मला केवळ असे वाटते, पण मला माहीत आहे कि ते तेथे आहे; पण मी पुढे चालत राहतो कारण मला माहीत आहे के ते मला कधीच भीती देणार नाही, त्याविषयी मी आभारी आहे.

आता, तो सांगू शकला असता, "ते आता पुढे नसेल," अगदी तसेच कि, "तुला पुन्हा भीती येणार नाही."

23 तर हि त्याची इच्छा आहे ज्याप्रमाणे हे होते, म्हणून मी त्याला स्वीकारतो आणि म्हणतो, "धन्यवाद, प्रभू, मी तसाच चालत राहीन."

24 आता, एका क्षणासाठी आपण आपली डोकी प्रार्थनेसाठी खाली झुकवू. येथे प्रार्थनेसाठी कोणती विशेष विनंती आहे का? (मला येथे रुमाल ठेवलेले दिसत आहेत.) आपला हात वर करा. प्रभू, तुझ्या प्रत्येक लेकराला आशीर्वाद दे.

25 आमच्या स्वर्गीय पित्या, आम्ही आता तुझ्या महान, ऐश्वर्यशाली कृपेच्या सिंहासनासमोर येत आहोत, कारण आम्हाला तसे करण्यास सांगितले आहे. आम्ही येशू ख्रिस्ताच्या म्हणण्याप्रमाणे येत आहोत. आणि आम्ही आमच्या सर्व चिंता घेऊन येत आहोत, आणि त्या त्याच्यावर लादत आहोत कारण तो आमची काळजी करतो. तो आमची काळजी करतो हे जाणणे, किती आरामदायी आहे. स्वर्गाचा महान देव, निर्माणकर्ता; आम्ही जे त्याची निर्मिती, आमची तो काळजी करतो. प्रभू, आम्ही त्यामुळे खूप आनंदी आहोत. हे किती समाधान आहे, ह्या समायात ज्यामध्ये आम्ही राहत आहोत, जिथे तुझ्या शब्दाशिवाय दुसऱ्या कशातूनही समाधान मिळू शकत नाही. तुझे वचन, हे आमचे सांत्वन आहे. आणि तुझ्या वचनात तू म्हटलेस, आम्ही आमच्या विनंत्या सांगाव्यात, आणि "जर तुम्ही काहीही माझ्या नावाने मागितले, तर मी ते करीन." आणि ही सर्व महान वचने: "मागा म्हणजे तुम्हाला मिळेल. ह्या पर्वताला म्हणा, 'हलविला जा,' आणि संशय करू

नका, आणि तो हलविला जाईल.” ही सर्व वचने, आणि आम्ही त्यांतून अगदी जे आम्ही मागत आहोत ते मिळवू शकतो.

26 जे हात वर आहेत, त्यांना काहीतरी हवे आहे, प्रभू. तू त्यांची गरज जाणतोस; ती पुरव, हे पित्या. मी त्यांच्यासोबत माझी प्रार्थना तुझ्यापुढे ठेवितो, त्यांच्यासोबत माझा हात वर आहे. ह्या टेबलवर रुमाल पडले आहेत. ओह, कशाप्रकारे हे लोक विश्वासाने, शूर विश्वासाने, प्रभू..., असे मानतात कि तू मला कशानेतरी आशीर्वादित केले आहे कि ज्याद्वारे, मी आजारी लोकांसाठी प्रार्थना करू शकतो. जिथे कुठे, कोठेही, जिथे कुठे मी जातो, तेथे नेहमी आजाऱ्यांसाठी प्रार्थना करण्यासंबंधी असते. देवा, आता मदत कर. मी प्रामाणिकपणे प्रार्थना करतो कि तू, ज्या लोकांनी हे रुमाल येथे ठेवले आहेत त्यांच्या मागण्या मान्य कर. तुझी कृपा त्यांच्यावर असुदे.

27 प्रभू आम्ही जाणतो कि बहिण हिक्ससोबत एक स्त्री येथे आहे, जी कोठूनतरी येथे विमानाने आलेली आहे, तिला कर्करोग आहे; व ती प्रार्थनेची अपेक्षा करते. मी प्रार्थना करतो देवा, कि तू त्या व्यक्तीला जीवनदान दे; हे मान्य कर. माझा छोटा पुतण्या, मिकी, तेथे पलीकडे उलट्या करीत, उच्च तापाने आजारी आहे. प्रभू, मी—मी मानतो आम्ही तेथे विश्वासाने प्रार्थना केली आणि तू ते थांबविले आहे, आणि मी—मी—मी तुझा आभारी आहे, हे जाणून कि मी रूम सोडताना, त्या मुलापासून ताप जात आहे.

28 आता, प्रभू...आणि मी ह्या सर्व गोष्टींसाठी तुझे आभार मानतो. आता हे माझ्या भाग्यात आहे कि मी तुझ्या वचनावर बोलावे. आम्हाला तुझे वचन दे, प्रभू. “तुझे वचन सत्य आहे.” आमचे जीव आशीर्वादित कर आणि आम्हाला गरज असलेली तुझी कृपा दे, कि आम्हाला ती आजच्या रात्री देवाच्या वचनांतून ओढता यावी, जी आम्हाला राहिलेल्या आठवड्यात टिकवून ठेवील; हे मान्य कर. आमच्या पाळकांना आशीर्वाद दे, हा शूर आत्मा, त्यांची पत्नी, त्यांची मुले, डिकन्स, खजिनदार, आणि प्रत्येक व्यक्ती, जी ह्या इमारतीमध्ये येते व बाहेर जाते; हे मान्य कर पित्या. येशू ख्रिस्ताच्या नावामध्ये आम्ही हे आशीर्वाद मागतो. आमेन.

29 आता, मला प्रभूच्या वचनांतून दोन ठिकाणांतून वाचायचे आहे. प्रथम मला स्तोत्रसंहिता पुस्तकातून, 86 वे स्तोत्र वाचायचे आहे. आणि नंतर मला संत मत्तय पुस्तकांतून 16 वा अध्याय, 1 ते 3 वाचायचे आहे. आणि मला ह्या स्तोत्रांतील काही भाग वाचायचा आहे, ते पूर्ण नव्हे पण 11 व्या वचनापर्यंत, म्हणजे जवळ जवळ त्या स्तोत्रांतील अर्धा भाग.

30 आणि मला ह्याची घोषणा करायची आहे, जे मी ह्याला शीर्षक देतो, ते प्रचार करण्यापूर्वी: *संघटीत होण्याची वेळ आणि चिन्ह*. “संघटीत होण्याच्या समयाचे चिन्ह,” हे थोडे किचकट वाटते. *संघटीकरण*; पाहा? *समय*; संघटीत होण्याची वेळ, तोच जो आता आहे. आणि त्या संघटीत होण्याच्या वेळेचे *चिन्ह*.

31 स्तोत्र—स्तोत्रामध्ये, दाविदाची प्रार्थना, 86 वे स्तोत्र.

*हे प्रभू, कान लाव, मला उत्तर दे; मी दीन व दरिद्री आहे.*

*माझ्या जीवाचे रक्षण कर, कारण मी तुझा भक्त आहे; हे माझ्या देवा तुझ्यावर भाव ठेवणाऱ्या सेवकाचे तारण कर.*

*हे प्रभू, माझ्यावर कृपा कर; कारण मी दिवसभर तुझा धावा करितो.*

*हे प्रभू, आपल्या सेवकाचा जीव हर्षित कर; मी आपले चित्त तुझ्याकडे लावितो.*

*हे प्रभू, तू उत्तम व क्षमाशील आहेस आणि तुझा धावा करणाऱ्या सर्वांवर विपुल दया करणारा आहेस.*

*हे प्रभू, माझ्या प्रार्थनेकडे कान दे;...माझ्या काकुळतीच्या वाणीकडे लक्ष दे.*

*मी आपल्या संकटसमयी तुझा धावा करीन: कारण तू मला उत्तर* देशील.

ओह हे सुंदर नाही का? "तू मला उत्तर देशील".

*हे प्रभू, देवांमध्ये तुझ्यासमान कोणी नाही; आणि* तुझ्या कृत्यांसारखी *कोणतीही कृत्ये नाहीत*.

*हे प्रभू, तू उत्पन्न केलेली सर्व राष्ट्रे येऊन तुझ्या पाया पडतील,* तुझ्या *नावाचा महिमा गातील.*

*कारण तू थोर व अदभूत कृत्ये करणारा आहेस: तूच केवळ देव आहेस.*

आता ऐका.

*हे प्रभू, तुझा मार्ग मला शिकव; मी—मी तुझ्या सत्यामार्गाने चालेन: तुझ्या नावाचे भय धरण्यास माझे चित्त एकाग्र* (एकाग्रता! पाहिले?)...*कर.*

32 मी आता *संघटणाबद्दल* बोलत आहे; आणि *समयाचे चिन्ह*. आता, संत मत्तयच्या 16 व्या अध्यायात.

*तेव्हा परुशी व सदुकी ह्यांनी येऊन,...*येशूची *परीक्षा पाहण्याकरिता, आम्हाला आकाशांतून काही चिन्ह* दाखवा *अशी त्याच्याकडे* मागणी *केली.*

आणि *त्याने त्यांना उत्तर दिले,* तुम्ही *संध्याकाळी म्हणता,...उघाड होईल,...कारण आभाळ तांबूस आहे;*

*आणि तुम्ही सकाळी म्हणता, आज झड लागेल, कारण आभाळ तांबूस व गडद आहे. अहो ढोंग्यांनो,* तुम्हांला *आभाळाचे स्वरूप ओळखता येते, पण* काळाची *लक्षणे* तुम्हाला *ओळखता येत नाहीत?*

प्रभू ह्या वाचलेल्या वचनावर त्याचा कृपापूर्ण आशीर्वाद घालो.

33 आता, आपण ह्या संघटीत संघटीत होण्याच्या समयाबद्दल बोलत आहोत; संघटीत होण्याच्या समयाचे चिन्ह. पाहा, येशू येथे होता, वाचलेल्या ह्या शेवटच्या वचनात, तो धर्माधिकाऱ्यांना दोष देत होता, समय व समयाचे चिन्ह न ओळखल्यामुळे. आता, पाहा लोकांसाठी, ते *ज्या समयामध्ये राहत आहेत तो समय ओळखणे* ही नेहमीच एक महत्वपूर्ण गोष्ट असत आली आहे; कारण देव ते अगदी सरळपणे लिहितो कि जेणेकरून कोणीही ते चुकवू शकत नाही.

34 आता सर्वसाधारणपणे, मी मागे जातो आणि काही दुसऱ्या सेवकांविषयी बोलतो, प्रभूचे बायबलच्या वेळचे काही दुसरे सेवक (जसे नोहाच्या काळाचे चिन्ह, दानिएलाच्या काळाचे चिन्ह, आणि—आणि अशी पुढे वेगवेगळी चिन्हे), परंतु आजच्या रात्री—वेळ वाचविता यावा म्हणून,...मी तसे करणार नाही. परंतु हा देवाचा मार्ग आहे कि तो प्रत्येक समायात त्या समयाचे चिन्ह देत आला, जेणेकरून सर्वांना समजावे की ते कोणत्या समायात आहेत. आणि ह्या परुश्यांनी त्यांचा समय जाणायला हवा होता. त्यांनी जाणायला हवे होते कि तो कोणता समय होता. त्याने अजून एका ठिकाणी म्हटले, "जर तुम्ही मला ओळखले असते, तर तुम्ही माझा दिवस ओळखला असता." पहिले? हि—हि खूप—महान गोष्ट आहे कि आपल्याला समजते. पाहा, "समजण्याशिवाय!"

35 त्याचप्रकारे, ते नेहमी संदेष्टयांविषयी म्हणत असत, ते म्हणाले, “आणि त्याला प्रभूकडून येणाऱ्या दृष्टांताद्वारे समज होती. आणि प्रभूचे वचन जुन्या काळाच्या संदेष्ट्यांकडे आले.” पाहिले, त्यांना संदेष्टयांकडून आलेल्या देवाच्या वचानाद्वारे, समज होती. आणि मग—मग संदेष्टे चिन्ह देत. जसे, एक मनुष्य एका बाजूला खूप वेळ पडून राहिला, आणि मग फिरून दुसऱ्या बाजूला पडून राहिला. एका मनुष्याला आपले कपडे फाडावे लागले. आणि ओह, ते ज्या समयात राहत होते, त्याचे चिन्ह दाखविण्यासाठी अशाप्रकारच्या अनेक गोष्टी त्यांनी केल्या. आणि आता आपल्याला माहीत आहे कि ज्या देवाने आकाश आणि पृथ्वी निर्माण केली, आणि अशाप्रकारे त्याचे कार्य ठेवले कि तो आपला समय चिन्हाद्वारे वर्णितो, तोच देव आज जिवंत आहे. तर आपण असलो पाहिजे, काहीतरी...मग आता जसे आपण ज्या समयात राहत आहोत तो आपण बघत असताना, असे काहीतरी असायला हवे जे कोणीतरी, कुठेतरी दुर्लक्षित करत आहे. पाहिले? कारण देव, आपण समजावे असे निश्चित चिन्ह दिल्याशिवाय, ह्या गोष्टी कधीच घडू देणार नाही.

36 आता आज येथे ती गोष्ट अशी आहे, कि जी धर्मपंडित, आपण योग्य प्रकारे वाचत नाहीयेत. हे त्या वेळेप्रमाणेच आहे, जेव्हा त्यांनी विचार केला नाही कि तोच तो समय होता. त्यांना—त्यांना असे वाटले कि ते त्या वेळी खूप शांतीने जगत आहेत, आणि म्हणून ते मसिहाची वाट पाहत नव्हते. आणि येशूने म्हटले कि त्याचे येणे हे “रात्री येणाऱ्या चोराप्रमाणे असेल,” जेव्हा—जेव्हा लोकं त्याच्या येण्याविषयी सावध नसतील. परंतु, तेथे त्यांतील काही कुमारी होत्या ज्या त्याला सामोरे गेल्या, त्यांतील अर्ध्या, त्यांच्या दिव्यांत तेल होते व त्या तयार होत्या; त्या चिन्हाकडे पाहत होत्या. आणि त्याच त्या आहेत ज्यांच्याशी मी आजच्या रात्री बोलत आहे, पाहा, त्यांच्याशी जे चिन्हाची वाट पाहत आहेत, त्याच्या येण्याचे चिन्ह.

37 ही चिन्हे, जू प्रभुने दिली आहेत, ती केवळ विश्वासणाऱ्यांसाठी देण्यात आली आहेत. अविश्वासणारे ती कधीच पाहत नाहीत. ते अगदी त्यांच्यावरून जातात, आणि त्यांना ती दिसत नाहीत. आणि आता हे एवढे खात्रीपूर्ण कि तो देवाचा दूत जो ह्या मंचावर आज रात्री उभा आहे, ते एवढे सत्य आहे कि जसे—जसे मी तुमच्याकडे पाहत आहे, आणि मी त्याकडे पाहत असेन किंवा तुम्ही त्याकडे पाहत असाल आणि मला दिसू शकत नसेल किंवा मी त्याकडे पाहत असेन; आणि तुम्हाला दिसत नसेल. आता, तुम्हाला माहीत आहे कि हे वचनाप्रमाणे आहे; हे अगदी बरोबर सत्य आहे. त्यांनी पाहिले...तुम्हाला माहीत आहे पौल खाली पडला, पण त्यांना...त्यांच्यांतील कोणालाही तो प्रकाश दिसला नाही.

38 तो प्रकाश तेथेहि होता जेव्हा योहान त्या नदीच्या काठावर हजारो धर्मपंडित आणि—आणि ज्ञानी पुरुष, महान मनुष्ये ह्यांच्या समोर उभा होता. आणि योहान स्वतः, म्हणाला, त्याने, देवाचा आत्मा कबुतरासारखा खाली त्याच्यावर उतरताना पाहिला, आणि एक वाणी ऐकली, जी म्हणाली, “हा माझा परमप्रिय पुत्र आहे आणि ह्याच्यामध्ये वस्ती करण्यास मी संतुष्ट आहे.” आणि योहानाव्यातिरिक्त कोणीही ते पहिले नाही. पाहिले? ते केवळ त्याच्यासाठी होते.

39 त्या ज्ञानी लोकांसाठी किती स्पष्ट चिन्ह होते ते तुमच्या लक्षात आले काय? त्यांनी पाहिले, कि तेथे...ते इब्री होते. ते खरोखर भारतीय खगोलतज्ञ नव्हते, ते इब्री होते; कारण ते तेथे वर त्या देशामध्ये आपले शिक्षण संपवित असताना खगोलशास्त्राचा अभ्यास करत होते. आणि जेव्हा त्यांनी...येरुशलेमेकडे पाहिले, आणि त्यांना समजले होते कि त्यांनी आपल्या—आपल्या जन्म-राशीप्रमाणे तीन तारे पाहिले जे हाम, शेम आणि याफेद ह्यांच्या जन्म-राशीप्रमाणे होते, आणि ते तिघे प्रत्येकी त्या-त्या कुळातले होते.

त्यांच्यासाठी ते एक चिन्ह होते कि, जेव्हा ते तीन तारे एका रांगेत येतील, तेव्हा मसीहा पृथ्वीवर असेल.

40 अरे बापरे! ह्यात काहीच आश्चर्य नाही कि ते येऊन विचारू लागले, "तो कुठे आहे? यहुदी लोकांचा राजा म्हणून जो जन्माला आला आहे तो कुठे आहे? आम्ही पूर्वेकडे त्याचा तारा पाहिला आहे, आणि त्याची आराधना करण्यासाठी आलो आहो. तो कुठे आहे?" त्यांना माहीत होते कि तो बालक मसीहा कुठेतरी ठेवलेला आहे, कारण देवाने त्यांना त्या समयाचे एक चिन्ह दिले होते, की देव व मनुष्य एकत्र संघटीत होत आहेत. काय एकीकरण आहे, जेव्हा देवाने स्वतःला एका मनुष्याच्या शरीरात संघटीत केले! आतापर्यंत झालेल्या सर्व एकत्रीकरणांपैकी, सर्वात महत्वाचे एकत्रीकरण हे होते जेव्हा देवाने मनुष्याबरोबर एकी केली; आणि त्याची—त्याची देव असण्याची महान भव्यता सोडली आणि त्याचे तंबू पुढे ओढले आणि मानवी रूप धारण केले, आणि त्यांच्यातील एक बनला, कि जेणेकरून तो त्यांची सुटका करू शकेल. एकी. जिने काय? जिने देव आणि मनुष्य ह्यांच्यामध्ये सर्वकाळ शांती आणली; आपण किती आभारी आहोत.

41 आणि चिन्हे पाठविली नव्हती...आता फक्त विचार करा, प्रत्येक मनुष्य आणि सर्व खगोलशास्त्रज्ञ; त्याकाळचे लोकं, तारे हे त्यांची घड्याळे होती. तेथे एक पहारेकरी असे, जो वर बुरुजावर चढून जात होता, आणि तो तेथे वर जाऊन पाहत असे. आणि जेव्हा तो पाही कि तारे फिरत असताना जेव्हा काही विशिष्ट तारे एखाद्या विशिष्ट नक्षत्रांमध्ये एकत्र येत, तेव्हा त्याला समजत असे कि तो कोणता समय आहे. आठवा वचनात काय दिले आहे, "पहारेकऱ्या, हा कोणता समय आहे?" आणि पहारेकरी परत आला आणि त्याने त्याला सांगितले कि तो कोणता प्रहर होता. पाहा, ते ताऱ्यांवरून वेळ ठरवत.

42 आता, हे विचित्र नाही का कि ते तारे अगदी एका रांगेत होते व ते केवळ तीन मनुष्यांखेरीज कोणीच पाहिले नाहीत? पाहिले? अगदी बरोबर रेषेत. आता त्याचप्रमाणे, तुम्ही वचनाबरोबर रेषेत असू शकता. पाहिले? जेव्हा ते तारे एकत्र येऊन एका नक्षत्रांमध्ये त्यांनी स्वतःला एक केले, त्याचवेळी तीन मनुष्येही एकत्र आले. आणि तुम्ही देवाबरोबर त्याच्या वचनात इतके एक होऊ शकता, जोपर्यंत ह्या गोष्टी वास्तविकता बनतील, आणि तुम्ही त्या पाहू शकाल आणि जाणाल कि त्या सत्य आहेत. पाहिले? समयाचे चिन्ह! तुम्ही कदाचित अगदी त्याच्यावर पाहाल, आणि म्हणाल, "आह, मूर्खपणा!"

43 पण *तुमच्यासाठी* ते मुर्खपण नाही. तुमच्यासाठी, तुमच्यासाठी, जे तुम्ही वचनाशी एक आहात, आणि येथे हे आहे. मग तो—तो पूर्ण प्रकाश आहे, भाऊ पॅट, जेव्हा—जेव्हा—जेव्हा—जेव्हा विश्वासणारा आणि वचन एक होताना तुम्ही पाहता. आणि तोच आहे ज्याला मी हे अभिभाषण करीत आहे, तो विश्वासणारा, अविश्वासणारा ते कधीही पाहत नाही. आणि जर आज तो येथे पृथ्वीवर असता, तर आज आपल्यांतील बऱ्याच धर्मपंडितांना किती दोषारोप असता, जे हे चिन्ह वाचू शकत नाहीत; ती चिन्हे जी आपण रोज ह्या प्रार्थनामंदिरात वाचतो, आणि ह्या गोष्टी पाहतो. आणि दुसरे ते वाचतात आणि भिंतीवरील लेख पाहतात, आणि तरीही अनेकजण त्यावर केवळ दुर्लक्ष करितात, आणि ते पाहतसुद्धा नाहीत. त्यांच्यासाठी ते काहीच नाही; ते त्यांच्या लक्षात येत नाही.

44 आता लक्ष दया, कि ह्यामध्ये, त्याने अनेक राष्ट्रीय चिन्हे दाखविली. आता, जेव्हा त्यांनी त्याला ह्याविषयी विचारले, त्यांना चिन्हे हवी होती; आणि त्याने त्यांना ती चिन्हे दिली जी घडली होती. आणि त्यांना जाणून घ्यायचे होते कि जगाचा अंत कधी होईल, अंतिम समायात काय चिन्ह असेल. आणि त्याने त्यांना वचनांतून अनेक ठिकाणी राष्ट्रीय चिन्हांबद्दल, स्वर्गातील स्वर्गीय चिन्हांबद्दल आणि पृथ्वीवरील चिन्हांबद्दल दाखविले;

त्याने त्यांना चिन्हे, चिन्ह, चिन्हे, सतत एक चिन्ह दिले. आणि जेव्हा त्याने त्यांना एका ठिकाणी एका राष्ट्रीय चिन्हाबद्दल सांगितले, त्याने म्हटले, "जेव्हा तुम्ही पाहाल कि राष्ट्रे, यरुशलेमेभोवती जमत आहेत, तेव्हा पाहा तुम्ही जाणा कि संकट जवळ आहे, जेव्हा तुम्ही यरुशलेमेभोवती सैन्याचा वेढा पाहाल."

45 आता, ते हे करण्यापूर्वी, देव...जगाने एकत्र येणे जरुरीचे आहे. टायटस, नावाचा महान रोमन अधिकारी आपल्या सैन्याला एकत्र करून त्यांच्याभोवती आला, जेव्हा ह्या यहुद्यांनी, देवाने त्यांच्यासाठी त्या समायात पाठविलेले चिन्ह नाकारीले. तीच ती वेळ होती जेव्हा टायटसने आपले सैन्य एकत्र करून, तो ते शहर घेण्यासाठी आला. राष्ट्र देवाच्या लोकांविरुद्ध एकत्र येण्यापूर्वी, प्रथम ज्यांना देवाची लोकं म्हटले ते लोक देवाच्या वचनाविरुद्ध एकत्र आले. पाहा, ते—ते—ते एकत्रीकरण, एकत्रीकरण; एकत्र होणे.

46 मी विश्वास करतो कि आपण एका महान एकत्रीकरणाच्या समायात राहत आहोत. मी हे लाल दिवे, आणि चकाकणाऱ्या खुणा ह्यांची नोंद करीत आहे (स्त्रिया कशाप्रकारे वागत आहेत, पुरुष कशाप्रकारे वागत आहेत; आणि मंडळी कशी वागत आहे.) आणि माझ्या पूर्ण हृदयापासून, ह्या समूहाला, हे दाखवीत आहे कि आपण ह्या महान भविष्यसूचक काळात, परमेश्वराच्या वचनात सरळ होत आहोत आणि प्रभू येशूच्या येण्याच्या अगदी अगोदर; एकत्र येऊन तयार होत आहोत.

47 आता, तुम्ही पाहा, टायटसने राष्ट्रांचे...त्याचे सैन्य एकत्र करण्यापूर्वी, इस्राएली लोकं एकत्र आले आणि त्यांनी स्वतःला असे आंधळे केले, कि ते येशूला मसीहा म्हणून स्वीकारणार नाहीत. त्यांनी त्याला नाकारले, आणि त्याला बाहेर काढले, आणि त्याला क्रुसावर खिळले. आणि जेव्हा त्यांनी त्यांच्यासाठी पाठविलेले तारण नाकारले, ते तसे करण्यासाठी एकत्र आले. आता हे लक्षात ठेवा; ते सगळे एकत्रित आले; त्या समयाचा संदेश नाकारण्यासाठी! त्यांना तसे करणे होते. आणि जेव्हा त्यांनी तसे केले तेव्हा राष्ट्रीय चिन्ह आत आले.

48 राष्ट्रे एकत्र येण्यास सुरुवात झाली आणि टायटसने ते महान रोमी आणि ग्रीक सैन्य आणले आणि यरुशलेमेच्या भिंतींना वेढा घातला, आणि तेथे असलेल्या लोकांना ताडले, आणि ते भुकेने मृत्यू पावले. त्यांनी झाडाची साल खाल्ली.योसेफुस नावाचा महान इतिहासकार आपल्याला सांगतो. आणि त्यांनी भूमीतून गवत उपटून खाल्ले. त्यांनी एकमेकांची मुलेही शिजवून खाल्ली, पाहा, जसे कि ते वेडावून गेलेले लोकं होते. आणि जेव्हा शेवटी, टायटस तेथे यरुशलेमेभोवती वर पर्वतांवर वेढा घालून होता, आणि—आणि त्या लोकांना वाटले कि ते देवाच्या इच्छेप्रमाणे करत आहेत, जेव्हा त्यांनी हे सैन्य चाल करून येताना पहिले. महान गुरु, येशू ख्रिस्त ह्याने त्यांना ह्याविषयी सांगितले होते तेव्हा त्यांनी त्याचे ऐकण्याचे नाकारले होते.

49 त्यांच्यात एकही ख्रिस्ती नव्हता जो पकडला गेला कारण त्यांनी चिन्ह पाहून त्याप्रमाणे ते पुढे गेले होते. पाहिले? त्याने म्हटले, "जे माडीवर असतील त्यांनी खाली येवू नये, किंवा जे शेतात असतील त्यांनी त्यांचा अंगरखा घेण्यासाठी परत जाऊ नये, पण यहुदियात पलायन करावे आणि तुमचे युद्ध थंडीत किंवा शब्बाथ दिवशी होऊ नये म्हणून प्रार्थना करा." कारण थंडीमध्ये, ते—ते पर्वत बर्फाने आच्छादिलेले असतात; आणि शब्बाथ दिवशी, दरवाजा—दरवाजे बंद असतात, मुख्य दरवाजा, आणि त्यामुळे ते त्या अवस्थेत पकडले गेले असते. पाहिले? जर देवाची इच्छा असेल तर, आपल्याला लवकरच त्यावर पाहायचे आहे...कशाप्रकारे देव गोष्टी करतो.

50 आता लक्षात घ्या, त्याने...त्यांनी तशाप्रकारे प्रार्थना केली...कि हे तशाप्रकारे होऊ नये, येशूने त्यांना त्यासाठी प्रार्थना करण्यास सांगितले होते, आणि त्यांच्यांतील एकही तेथे त्यामध्ये पकडला गेला नाही. ते गेले होते कारण त्यांनी चिन्हाकडे पहिले आणि ते गेले होते; बस्स त्यांच्यासाठी तेच होते.

51 ओह, कशाप्रकारे आजच्या मंडळ्यांनी आपण राहत असलेल्या समायाचे चिन्ह जाणायला हवे! जीवन मिळावे म्हणून तुम्ही, होईल तितक्या जलद कालवरीकडे पळा; एखाद्या मंडळींकडे नव्हे, तर येशू ख्रिस्ताकडे. तुम्ही स्वतःला त्याच्याशी संघटित करा, आणि कोणत्या समूहाशी किंवा सांप्रदायिक मंडळींशी नाही. ख्रिस्ताबरोबर संघटित व्हा आणि खात्री करा की तो तोच आहे. तुम्ही काहीही असेच घेऊ शकत नाही; तुम्हाला त्याच्याविषयी सकारात्मक खात्री असायला हवी. एकत्रिकरणाची किती चांगली वेळ आहे.

52 आता, आपल्याला समजते कि त्यांनी मासिहाला नाकारले आणि ते सर्व एकत्र झाले आणि स्वतःसाठी एक अंतर केले, आणि त्यांच्यामध्ये अशी...हालचाल पसरविली कि कोणी व्यक्ती जर येशूचा संदेष्टा म्हणून स्वीकार करील तर तिला त्यांच्या मंडळीतून बहिष्कृत करण्यात येईल. तुम्हाला तो आंधळा मुलगा आठवतो का ज्याचे डोळे आंधळे होते? आणि शिष्यांनी विचारले, "कोणी पाप केले? त्याने, कि त्याच्या आईने, त्याच्या वडीलाने?"

53 आणि येशूने म्हटले, "ह्या बाबीमध्ये कोणीही नाही, पण देवाचा महिमा प्रगट व्हावा म्हणून."

54 आणि आठवा, त्यांनी म्हटले की आई आणि वडील सांगू शकले नाही. ते म्हणाले, "हा आमचा मुलगा आहे, पण आम्हाला ठाऊक नाही की तो कसा बरा झाला." कारण यहुद्यांनी त्यांना सांगितले होते की जर कोणी त्याला संदेष्टा म्हणून कबुल केले, तर त्यांना बहिष्कृत करण्यात येईल.

55 पण, तुम्ही पाहा, देवाचे कार्य असे आहे की हा मुलगा त्या समूहाला निगडित नव्हता. आणि तो म्हणाला, "माझ्यासाठी हि विचित्र गोष्ट आहे की हा मनुष्य कोठून आला हे तुम्हाला माहीत नाही आणि तरी त्याने मला दृष्टी दिली." पाहिले? आता तो हे बोलू शकला. पाहा हे देवाचे काम आहे. त्याला आरोग्य दिले होते आणि त्याला बरे करण्यात आले होते आणि तो हे म्हणू शकत होता कारण त्याचे धागे कुठेही बांधलेले नव्हते. तोच तो होता ज्याच्यावर हे कार्य घडले होते आणि त्याने हे नक्कीच...त्याच्या जीवनात पहिल्यांदा पाहिले होते.

56 आता, यहुदी लोकांनी स्वतःला येशूविरुद्ध संघटित केले होते, आणि त्याच्या मसिहीपणाविरुद्ध आणि त्याच्या मसिही संदेशाविरुद्ध. आपण पाहतो कि तीच गोष्ट आता घडत आहे, अगदी तीच गोष्ट. साम्यवाद मंडळीचा नाश करण्यासाठी संघटित होत आहे, आणि एकच मार्ग असा की...मंडळीनेही स्वतःला मंडळ्यांच्या परिषदेमध्ये संघटित केले आहे, वैश्विक मंडळ्यांच्या समूहामध्ये, संदेशाचा, वचनाचा नाश करण्यासाठी! त्यांनी वचनाला खाली केले आहे, मंडळ्यांनी हे केले आहे! ते ह्याचा स्वीकार करू शकत नाहीत कारण ते त्यांच्या सांप्रदायिक शिकवणीच्या विरुद्ध आहे; कितीही अग्निस्तंभ... लोकांमध्ये उतरले, किंवा कितीही लोकं...कितीतरी गोष्टी अगोदर सांगितल्या जाऊन तशाच घडल्या, आणि सर्व महान चिन्हे ज्याविषयी त्याने शेवटल्या दिवसासाठी वचन दिले, तरीही त्यांना काहीच फरक पडत नाही, ते हे करूच शकत नाही.

57 त्यामुळे, ते स्वतःला संघटित करीत आहेत, आणि तुमचे पाळक आणि अनेकजण तुम्हाला सांगू शकतील, की ते...जागतिक पातळीवर मंडळ्यांचे ऐक्य साधण्यासाठी

चळवळ करीत आहेत. आणि तो...एक लुथरन सेवक आहे जो ह्यामागे लागला आहे, म्हणतो. की, जर आपल्या शेजारी कोणता अनर्थ घडला, आणि जर आपण ह्या जागतिक पातळीवरील चळवळीत संघटित नसू, तर मग आपले प्रार्थनाघर हे एक प्रार्थनाघर राहणार नाही, आणि ते त्याचा उपयोग कोठार म्हणून करतील. आणि जर आपल्यापैकी कोणत्या भावाने कोणाला मरताना किंवा क्लेशामध्ये पाहिले, आणि त्याची कोणत्या आत्मिक दानाने सेवा करण्याचा प्रयत्न केला, तर आपल्याला त्यामुळे गोळी झाडली जाईल; अगदी बरोबर. आपल्याला कोणतीही आध्यात्मिक सेवा करण्याचा दंड म्हणून दहा वर्षांचा कारावास होऊ शकतो, कारण आपण त्या जागतिक पातळीवरील चळवळीचे सदस्य नाहीत म्हणून. तुम्हाला पशूची छाप दिसत नाही काय? पहिले? पहिले?

58 आता, आपण पाहतो कि हा संघटित होण्याचा समय येत आहे. पाहिले? आता, बघा! आता मंडळीने स्वतःला संदेशाच्या विरोधात संघटित केले आहे; आणि मग जेव्हा ती असे करील, तेव्हा राष्ट्रे, मंडळीचा नाश करण्यासाठी, साम्यवादामध्ये स्वतःला संघटित करत आहेत; अगदी तसेच जसे त्यांनी प्रथम केले होते. पहिले? ह्याची पुन्हा पुनरावृत्ती होत आहे.

59 इस्राएलाने प्रथम संदेशाला खाली केले. आणि जेव्हा त्यांनी संदेश खाली केला, तेव्हा (इतर राष्ट्रांतील) सैन्य एकत्र आले, आणि त्यांनी येऊन मंडळीचा नाश केला. आणि आज, त्यांनी प्रभू येशूचा संदेश खाली केला आहे, आणि त्यांनी तो खाली केला आहे. आणि आता समय आला आहे जेव्हा साम्यवाद मंडळीच्या विरोधात, जगाला संघटित करत आहे. पाहा, हे त्याचप्रकारे व्हायला हवे. आता, हे बोलणे कठीण आहे.

60 त्या यहुदी लोकांनाही त्याचा विश्वास करणे कठीण होते, ते म्हणाले, "आता, भावांनो, या, आम्ही पाहतो की—की आमचा—आमचा देव आमच्याबरोबर आहे, आणि म्हणून आपण—आपण मंदिरामध्ये जाऊया. आणि आता आपण प्रार्थना करू, आणि *अमुक-अमुक* पवित्र पाद्री आणि *अमुक-अमुक* पवित्र पाद्री प्रार्थनेचा पुढाकार करतील. मुख्य द्वार बंद करा!" आणि टायटसने त्याचे स्थान घेतले, आणि अगदी तेथेच जवळजवळ एक वर्षभर किंवा अधिक काळ राहिला. पाहा, अगदी तेथेच पहारा देत, आणि त्यांची तेथेच भुकमार केली. त्याच्यांतील एकजण देखील शहराच्या बाहेर जाऊ शकला नाही, आणि ते उपासमारीने मृत्यू पावले. आणि जेव्हा तो आत गेला आणि भिंती तोडून खाली पाडल्या तेव्हा रक्त एखाद्या नदीसारखे उसळून बाहेर पडले, तेथेच जिथे त्याने सर्वांची कत्तल केली.

61 आता देवाच्या दूताने त्याबद्दल जुन्या करारामध्ये भविष्यवाणी केली होती आणि सांगितले होते की तसे घडेल. आणि त्यावेळचे सेवक जे धर्मपंडित होते, ज्यांची पोस्ट लोकांना हे सांगण्यासाठी होती; त्याऐवजी जेव्हा येशू त्यांच्यामध्ये उभा राहिला, त्यांनी त्याला ओळखलेदेखील नाही; आणि काही प्रकारची अंधश्रद्धा करण्याचा प्रयत्न केला, ते म्हणाले, "आम्हाला एखादी युक्ती दाखव, आम्हाला पाहुदे की ती कशी—कशी करतात! आम्हाला एखादे चिन्ह दाखव." पाहिले?

आणि त्याने म्हटले, "मी..." काय, त्याने इतक्या गोष्टी केल्या आणि तरीही ते पाहू शकले नाहीत. पाहिले? आणि मग जेव्हा त्यांनी त्याला नाकारले...त्या दिवसाचा संदेश, त्यांनी त्या दिवसाचा संदेश नाकारला.

62 ते त्या दिवसाचे चिन्ह पाहण्यास चुकले. आणि बायबलमधील भाविष्यवणीचे चिन्ह त्यांच्यापुढे ठेवण्यात आले, आणि ते म्हणाले, "आता, आपण आत जाऊया!" ती पवित्र मनुष्ये होती. ते असे मनुष्य होते की तुम्ही त्यांच्या जीवनावर बोट दाखवू शकला नसता.

ते *त्याप्रकारे* राहून एक याजक असू शकत नव्हते. कोणत्याही छोट्याश्या गोष्टीमुळे एखाद्या याजकाला मरणदंड होऊ शकत होता, त्याला धोंडमार करून मारले जाऊ शकत होते. आणि आता, ते महान पुरुष होते, लोकांच्या नजरेत ते खूप पवित्र मनुष्य होते. आणि तरीही ते आत गेले आणि म्हणाले, "आता आपण…आपल्याबरोबर देव आहे, तोच देव जो पिढ्यानपिढ्या आपल्यासोबत आहे. आपण त्याच्या मंदिरात जाऊया." ते देवाचे पवित्र मंदिर होते. पाहिले? "आपण प्रभूच्या घरात जाऊया. आता तुम्ही सर्व इब्री लोकं हे जाणता कि आपण निवडलेले लोकं आहोत, आपण येथे आहोत. आणि देव आपला देव आहे, अब्राहाम, इसाहाक आणि याकोबाचा देव. तो आपल्याबरोबर आहे. तो आपल्याला त्या बेसुंती लोकांपासून सोडविल जे बाहेर आहेत, (ज्याप्रमाणे ते होते) ते रोमी आणि ग्रीक लोक. तो आपल्याला त्यापासून सोडविल. आपण प्रभूच्या घरात जाऊया!"

63 हे ऐकायला चांगले वाटते; परंतु त्यांनी काय केले होते? त्या घराचे बांधकाम करणारा एका कनिष्ठ गालिली सुताराच्या स्वरूपात तेथे होता, आणि त्यांनी त्याला खाली केले होते, जेव्हा देवाने त्याला त्या समयाचा व शाखेचा असा त्याचा संदेशवाहक म्हणून प्रगट केले होते. आणि त्यांनी ते खाली पाडले. त्यामुळे सर्व प्रार्थना, सर्व प्रामाणिकपणा, त्यांची सर्व बलिदाने हे देवासाठी कोणतेच महत्वाचे नव्हते. त्यांनी तसे केले होते! आणि त्यांचा नाश करण्यासाठी, देवाने हे महान सैन्य संघटित होऊ दिले.

64 आणि आज आपण पाहतो, की मंडळ्या, संप्रदाय आणि अशा काही प्रकारांद्वारे देवाचे वचन खाली पाडत आहेत. त्यांची इच्छा नाही की तुम्ही ह्या गोष्टींविषयी त्यांना सांगावे ज्या विज्ञानाने चित्र आणि दुसऱ्या सर्व बाबींनी सिद्ध केले आहे, आणि तरीही त्यांना त्याच्याशी काही घेणे नाही. त्यामुळे साम्यवाद त्यांचा नाश करण्यासाठी संघटित होत आहे, अगदी त्याचप्रकारे जसे टायटसने केले, आणि बायबल म्हणते की ते तसेच करतील. अगदी बरोबर!

65 आता, तुम्ही पाहता काय आपण कुठे राहत आहोत? त्या संघटिकरणाच्या समयात. जेव्हा आपण ह्या गोष्टी संघटित होताना पाहू, ओह, आपण ह्या गोष्टी पाहण्यास का अपयशी ठरतो! तुम्ही–तुम्ही येथे ह्या शास्त्रात बघू शकता आणि पाहा की तो काय करील म्हणून त्याने कुठे वचन दिले आहे. आता आपण पाहतो की ते पूर्ण होत आहे. आपण पाहतो की राष्ट्रे एकत्र संघटित होत आहेत. आपण पाहिले कि मनुष्यतत्वे संघटित होत आहेत, मंडळ्या संघटित होत आहेत. हा संघटित होण्याचा समय आहे. हा संघटित होण्याचा तास आहे. तोच ह्या काळाचा आत्मा आहे, "आपल्याला संघटित झाले पाहिजे." जे काही तुम्ही बोलता ते एखाद्या संघटनेतर्फे बोलायला हवे; नाहीतर सरकारही ते स्वीकारणार नाही.

66 तुम्हाला माहीत आहे, एक नागरिक म्हणून…एक नागरिक म्हणून मी हे करू शकत नाही, संयुक्त राष्ट्राचा एक नागरिक म्हणून, तरी मी—मी…तुम्ही मला पाच डॉलर रकमेचा एक धनादेश द्याल आणि मी त्यावर माझे नाव लिहू शकत नाही. पहिले? पाहा, मी हे करू शकत नाही. पाहा हा संघटित होण्याचा समय आहे. हे सर्व कोणत्यातरी प्रकारच्या संघातर्फे झाले पाहिजे आणि तो संघच ती गोष्ट आहे जी पशुची छाप आणते. पाहिले? हा संघटित होण्याचा समय आहे, आणि हे सर्व मिळून त्यासाठी काम करत आहे. जर तुम्ही त्यावर बघितले तर, हे तुमच्या साध्या डोळ्यांनी तुम्ही पाहू शकता. हा संघटित होण्याचा समय आहे ज्यामध्ये सर्वकाही एकत्र संघटित होत आहे.

67 ते यहुदी—यहुदी लोक येशूच्या विरोधात संघटित झाले आणि त्याला त्यांचा मसिहा म्हणून नाकारले. त्यामुळे आपण पाहतो की काय घडले. आपण आताही तीच गोष्ट पाहतो, मंडळी, अनेक मंडळ्यांच्या वैश्विक परिषदेत संघटित झाली आहे आणि संदेशाचा,

देवाच्या वचनाचा नाश करण्याचा प्रयत्न करीत आहे, त्यानंतर साम्यवाद मंडळीचा नाश करण्यासाठी संघटित होत आहे. ते त्यावर स्वार होण्याचा प्रयत्न करीत आहेत. एकच गोष्ट जी ते करू शकतात जी म्हणजे त्यांच्यासाठी एका परिषदेत खेचू शकतात. कारण ते छोट्या छोट्या समूहामध्ये वेगळे झाले आहेत; मेथोडिस्ट, आणि बॅप्टीस्ट, आणि लुथरन्स, आणि प्रेस्बेटेरियन, चर्च ऑफ क्राईस्ट, आणि असे अनेक समूह. ते काहीच करू शकत नाहीत कारण *हा* एक *ह्या* एकाच्या विरुद्ध आहे, आणि *हा* एक *त्या* एकाच्या विरुद्ध आहे, त्यांची शिकवण इतकी भिन्न आहे, जितकी पूर्व दिशा पश्चिमेपासून भिन्न आहे. पाहा, ते काही करू शकत नाहीत, परंतु जेव्हा ते एका मोठ्या छत्राखाली एकत्र येतील, मग ते करतील. मग ते करतील.

68 त्याचप्रकारे रोमन कॅथॉलिक हे इतक्या एकीमध्ये आहेत, ते रोमन कॅथॉलिक, नक्कीच ते एकीमध्ये आहेत, ते...रोमन कॅथॉलिक हे बहुतांश आहेत; जितकी संख्या रोमन कॅथॉलिक ह्यांची आहे तितकी ग्रीक आणि दुसरे कॅथॉलिक ह्यांची नाही. आता, ते एकत्र संघटित आहेत आणि ह्याच कारणामुळे ते एकत्र उभे राहतात. काहीही घडले तरी तो पोप हा सर्वांचा मुख्य आहे. पाहिले? आणि कोणी काहीही म्हणो, "तो कधीही न चुकणारा आहे; तो—तो—तो देवाऐवजी आहे, बस्स; तो देवाच्या बरोबरीचा आहे; त्याच्याकडे नरक, मरणानंतरचे पापक्षलनाचे ठिकाण आणि स्वर्ग, ह्यांवर हुकूमत आहे." पाहिले? म्हणून एकही गोष्ट *त्या* बाबतीत होऊ शकत नाही; तो जे काही म्हणतो तसेच व्हायला हवे.

69 आता, प्रोटेस्टंट लोकं त्यांच्यासाठी त्याचप्रकारे एक मुख्य बनवीत आहेत. आणि बायबल म्हणत नाही काय की तेथे पशुसाठी एक प्रतिमा बनविली होती? प्रतिमा काय आहे? ती म्हणजे त्यासारखी बनविलेली असते, त्याच्यासारखी बनविलेली. तेथे ती आहे, तीच गोष्ट. ते काय आहे? त्यांना स्वतःला एकत्र संघटित करून ती प्रतिमा केली आहे, आणि *संघटीकरण* हा ह्या युगाचा आत्मा आहे.

70 आता एकत्र संघटित होऊन, संदेशाचा नाश करण्याचा प्रयत्न करीत आहेत. ते कसा त्याचा नाश करतील? ते देवाच्या वाचनाचा कसा नाश करू शकतील? ते त्याला अप्रभावी बनवतात, त्यांच्या जुन्या परंपरा घेऊन, जसे त्यांनी सुरुवातीला केले, आणि देवाचे वचन अप्रभावी बनवितात. पाहा, ते म्हणतात, "ओह हे...खरोखर, काहीही झाले तरी,..." तुम्ही पाहा ती नास्तिक स्त्री कुठून, जी प्रयत्न करीत होती...ती...मी तिचे नाव विसरलो; मी ते आता बोलू शकलो असतो. ती...मी अशा खूप जणांचा विचार करण्याचा प्रयत्न करत आहे.

71 मी त्या दिवशी ह्या राष्ट्र सुंदरीचा विचार करत होतो. मला वाटते तशीच आणखी एक येथे उठली पाहिजे होती. ती अशी एक होती जी मध्यालयामध्ये गेली आणि मद्य बाहेर सांडले आणि चिन्हे बाहेर फेकली आणि असे सर्व काही केले. आज अशा प्रकारच्या स्त्रिया का उठत नाहीत ज्या येथे बाहेर जाऊन आणि स्त्री जातीचे नग्न चित्रे आणि असेच अनेक का फाडत नाही? यासाठी कि त्यांचे अस्तित्वच राहू नये.

72 आता, परंतु ही स्त्री, जी एक नास्तिक आहे, ती म्हणाली, की "बायबल हे संविधानाविरुद्ध आहे, जे पब्लिक शाळांमध्ये वाचले जाऊ नये." आणि अशा काही गोष्टी.

73 आता, तुम्ही हे पहिले आहे काय, की त्यांतील काही शास्त्राचे महान अभ्यासक असे म्हणतात, की, "बायबलमधील बऱ्याचशा भाविष्यवाण्या खोट्या आहेत आणि त्या कधीच पूर्ण झाल्या नाहीत." आणि तुम्ही ह्याविषयी ऐकले आहे आणि वाचले आहे. आणि ते असेच सर्वकाही सांगण्याचा प्रयत्न करीत आहेत, तुम्ही पाहा, ते वचनाचा प्रभाव

नष्ट करण्याचा प्रयत्न करत आहेत. जर ते ह्याचा नाश करून त्याऐवजी एक संप्रदाय आणू शकले किंवा काहीतरी जे मनुष्यांकडून आहे, जे त्यांच्या डोळयांना वचनापेक्षा श्रेष्ठ वाटते, तर ते त्यांच्या परंपरेने ह्याचा नाश करतात. आणि त्याचप्रकारे ते देवाच्या वचनाचा नाश करू पाहतात, सांप्रदायिक राजनीतीद्वारे.

74 आता, प्रत्येक मंडळीची स्वतःची राजनीती आहे. चर्च ऑफ क्राईस्टची स्वतःची, आणि बॅप्टीस्टांची, आणि मेथोडीस्टांची, आणि प्रेस्बेटेरियनांची; त्या सर्वांची स्वतःची वेगळी राजनीती आहे. आता, ते त्यापासून दूर जात आहेत कारण ते वेगळे आहेत. पाहा, ते असे अगोदर करू शकले नाहीत, त्यांना ते आता करणे आहे. पाहा, हा संघटित होण्याचा समय आहे, आणि आता ते हे सर्व एकत्र ठेवत आहेत आणि पाहा त्यापासून काय बाहेर आले. अरे बापरे, जसे की एक पावाचा लगदा जो घोड्याच्या मांसाने बनवून, भाजून, आणि एखाद्या डब्यातून कचरा काढून, आणि जे काही अधिक त्यांच्याकडे आहे; आणि ते सर्व एकत्र करून, आणि थोडे सडलेले बटाटे त्यात घालून आणि सर्वकाही एकत्र करून तुम्हाला जे मिळेल त्याप्रमाणे. मला नक्कीच त्यातले काहीच नको आहे. नाही महाशय! त्याचप्रकारे ते करीत आहेत. पाहा ते अशा लोकांना घेत आहेत जे विश्वास करितात की येशू एक दंतकथा होती, आणि एक मंडळी जी विश्वास करते की येशू एक दंतकथा होती आणि दुसरे काही, जे विश्वास करतात की तो एक संदेष्टा होता.

75 एक म्हणतो, "चमत्काराचे दिवस निघून गेले आहेत."

76 दुसरा म्हणतो, "कदाचित तसे काहीतरी असू शकते."

77 आणि हे सर्व एकत्रितरीत्या; आणि बायबल म्हणते, "दोघे कसे एकत्र चालू शकतील जर ते सहमत नसतील तर?" पाहिले? आता तशा प्रकारचे ऐक्य त्याच्याकडे आहे. आणि ह्या सर्वांवर एक पवित्र पाद्री असेल, आणि तेथेच तुम्ही पशुसाठी प्रतिमा तयार करता, अगदी तशीच जसे बायबल म्हणते. आता त्याच्याकडे एक लुथरन सेवक जो त्याचा मुख्य आहे. बरे, आपण पाहतो की हा संघटित होण्याचा समय आहे. तशीच गोष्ट आता आहे, साम्यवाद आणि सर्व जगात एकत्र होत आहेत; आणि मंडळीमध्येसुद्धा, सर्व एकत्र येत आहेत.

78 निसर्गाकडे पाहा. अरे बापरे! निसर्ग जर तुम्ही फक्त निसर्गाकडे पाहाल, तर तोही तीच गोष्ट करत आहे. निसर्ग हा देवाच्या चिन्हांची दिनदर्शिका (कॅलेंडर) आहे. तुम्हाला हे ठाऊक होते काय? येशूने त्यांना निसर्गाकडे पाहण्यास सांगितले. समुद्र गर्जना करेल, पाहा, आणि वेगवेगळी चिन्हे होतील, आणि वेगवेगळ्या भागांत भूकंप होतील, राष्ट्रीय संघर्ष, स्वर्गात चिन्हे, पृथ्वीवर चिन्हे, सर्व ठिकाणी ह्या येणाऱ्या समयाची चिन्हे असतील.

79 ढग पाहा. ढगातून मुसळधार पाऊस पडण्यापूर्वी ते कसे घडते? अनेक छोटे ढग एकत्र येऊन एक मोठा ढग तयार होतो. बरे, ह्याच्याकडे थोड्याशा हवेचा प्रवाह असतो, आणि ह्याच्याकडे थोड्याशा हवेचा प्रवाह असतो, आणि जेव्हा ते सर्व एकत्र हवा फुंकतात तेव्हा चक्रीवादळ येते. पाहिले? वादळ आणण्यापूर्वी ते एकत्र होतात; त्यांना व्हावेच लागते.

80 पाहा बदके आणि हंस, त्यांचा देश सोडण्यापूर्वी एकत्र संघटित होतात. पाहिले? ते एकत्र संघटित होतात. तुम्ही त्यांना ह्या तलावातून त्या तलावात उडताना पाहू शकता, इथून तेथे, ते सर्व एकत्र असतात. ते संघटित होतात, त्यांच्या उड्डाणासाठी तयार होत असतात. पाहा, हे केवळ...निसर्ग असा आहे, आणि देवाने निसर्ग बनविला आणि निसर्ग देवाच्या योजनेप्रमाणे चालतो. हा एक कायदा आहे, देवाचा एक अलिखित कायदा, की निसर्ग त्याच्या कायद्याप्रमाणे चालतो.

81 जसे मी एका अंत्यविधीच्या वेळी बोलत होतो, वनस्पतीच्या आत वाहणाऱ्या *रसाबद्दल* जो खाली खाचेत जातो, मुळाच्या अगदी तळाशी, आणि वसंत ऋतुमधील पुरुत्थानापर्यंत तेथे पडून राहतो. हा देवाचा एक नियम आहे. अशी कोणतीच बुद्धिमत्ता नाही जी त्या रसाला खाली घेऊन जाऊ शकते, तुम्ही त्याला सुकवू शकत नाही; तुम्ही त्यापासून दूध काढू शकत नाही. हे करण्याचा, देव जसे करतो, त्याशिवाय दुसरा कोणताच चांगला मार्ग नाही. देवाकडे परिपूर्ण मार्ग आहे. तर मग जेव्हा ते पण गळून खाली पडते; तेव्हा तो त्या रसाला खाली खाचेमध्ये पाठवितो आणि त्याला लपवितो. जसे इयोबाने म्हटले, "तुझा कोप संपेपर्यंत मला खाचेमध्ये लपव." पाहिले? थंडीअगोदर, तो तेथे खाली जातो कारण हा निसर्गाचा एक नियम आहे. पानांकडे पाहा, ते आता गळण्यास सुरुवात होते. का? हा निसर्गाचा नियम आहे.

82 सर्व बदके एकत्र येतील, त्यांच्यांतील प्रत्येकजण, आणि त्यांच्या नेत्याभोवती मेळावा भरतील. तेथे त्यांच्यात, त्यांना कसेतरी माहीत पडते, मला माहीत नाही ते कसे जाणतात, पण त्यांना माहीत असते की तो एक विशिष्ट बदक त्यांचा नेता आहे. आणि तो छोटा सोबती, ते सर्व एकत्र येतात आणि बरोबर त्याच्याभोवती मेळावा भरतात, आणि लगेच हवेत उडतात. आणि तो...तो पूर्वी कधीच त्या तळ्याच्या बाहेर गेलेला नसतो, पण तो होईल तितक्या सरळ, लुईसीयाना किंवा टेक्सास येथील तांदळाच्या शेतात जातो. पाहा, जेथे ते त्या वर्षी जन्मले, ते त्यांचे घर सोडण्यासाठी उड्डाण भरण्यापूर्वी, ते एकत्र संघटित होतात. आमेन! तेथे तुम्ही आहा; त्यांच्या नेत्याभोवती मेळा भरतात.

83 मनुष्याबरोबर ही समस्या आहे की त्याला माहीत नाही की त्याचा नेता कोण आहे. होय महाशय. ते संप्रदायाभोवती मेळा भरतील, ते एका बिशप किंवा मनुष्याभोवती मेळा भरतील, परंतु त्यांचा नेता, जो वचनांतील पवित्र आत्मा, त्याच्याभोवती मेळा भरणार नाहीत. पाहिले? ते म्हणतात, "ओह, मला भीती वाटते की मी थोडा वेड्यासारखा करीन; मला भीती वाटते की मी चुकीच्या पायावर उभा राहीन." ओह, तेथेच तुम्ही आहा! जर त्या छोट्या बदकाने म्हटले तर, "मला तो ज्या पद्धतीने त्याचे पंख ठेवतो ते आवडत नाही. मला वाटत नाही की मी त्याच्यामागे जाईन." तुम्ही गोठून मराल. तुम्ही तेथे अडकून राहाल, जर तुम्ही त्या विमानाबरोबर जसे ते जाते तसे गेले नाही तर. ते स्वतःला त्याच्याबरोबर संघटित करते, आणि निसर्ग तसे करते.

84 हंस त्यांना स्वतःला एकत्र संघटीत करतात, त्यांच्या नेत्याभोवती मेळा भरतात; ते तीच गोष्ट करतात.

85 तुम्ही कधी मधमाश्यांच्या थव्याकडे लक्ष दिले आहे काय? मधमाश्या थव्यामध्ये उडण्याअगोदर त्यांच्या राणीभोवती एकत्र संघटित होतात. हे बरोबर आहे. आणि जिथे ती जाते तेथे तेही जातात. होय! ते काय करतात? ते उडण्याअगोदर संघटित होतात. अगदी बरोबर; प्रत्येक नैसर्गिक घटक!

86 वसंत ऋतू येण्यापूर्वी मासे त्यांना स्वतःला एकत्र संघटित करतात. बाहेर महासागरामध्ये तुम्हाला ते आढळतील, ते विशाल...आपण त्यांना काय सांगतो "हम्पीस", सलमोन मासा. जेव्हा ते येथे वर येतात, ती धाव घेण्यापूर्वी, तुम्ही पाहाल की ते दहा हजारो असे असतात, तेथे बाहेर समुद्रात, आणि ते खारट पाण्याच्या भोवताली फिरतात, परंतु खरंतर ते गोड्या पाण्यातील मासे आहेत. आणि येथे ते, अंडी घालण्यासाठी, त्या गोड पाण्याच्या अगदी वर येतात. ते तेथे वर जातात आणि अंडी घालतात, साधारणतः प्रत्येक चार वर्षांनंतर, आणि अंडी घालताच ते मृत्यू पावतात. आणि त्यांना माहीत आहे की ते तेथे मरण्यासाठी जात आहेत आणि तुम्ही त्यांना कशानेही

थांबवू शकत नाही. ते मासे पकडण्याच्या जाळींतून आणि जे काही आहे त्यावरून उडया मारत तेथे वर जातील, हे माहीत असताना की ते त्यांच्या मृत्यूकडे जात आहेत. परंतु निसर्गाचा नियम त्यांना ह्याची जाणीव करून देतो की ते वर तेथे वर जाऊन तेथे त्या खाचेमध्ये अंडी देणार आणि मग मरणार. आणि मग छोटे मासे त्या अंड्यांतून बाहेर येतात आणि काहीतरी त्या सर्वांना एकत्र संघटित करते आणि ते बाहेर महासागरात जातात. हे एकत्रीकरण आहे! हा निसर्गाचा नियम आहे. तुम्ही देवाचा नियम तोडू शकतच नाही.

87 राष्ट्रे तुटत आहेत, अशा वेळेमध्ये जेव्हा आपल्याला माहीत आहे की ते असे करणार आहेत. आपण राष्ट्रीय तणावाच्या प्रक्रियेमध्ये आहोत. आपण पाहतो की राष्ट्रे संबंध तोडत आहेत. वर्षांमागून वर्षे जात असताना आपल्याला दिसते की हे राष्ट्र साम्यवादामध्ये गिळले जात आहे; हे साम्यवादामध्ये गिळले जात आहे. आणि अगदी येथे आपल्या देशामध्ये, साम्यवाद भगदाडे पाडत आहे, आणि तो ह्यावर वर्चस्व मिळवील! पाहा, तो तसे करील, आणि त्याला थांबविण्याचा कोणताच मार्ग नाही. का? तेच कारण ज्यामुळे तुम्ही टायटसला थांबवू शकले नाही. लोकांनी देवाला आणि त्याच्या वचनाला नाकारले आहे. होय, महाशय, आणि म्हणून ते हे करणार आहेत आणि आपण ते प्रक्रियेत आहे हे पाहत आहोत.

88 मी, नेहमी, दोनेक तास घेतो; आणि आतापर्यंत मी तीस मिनिटे घेतली आहेत. पाहिले? पण हे सर्व सामावून घेण्यासाठी मी घाई करीत आहे. तुम्ही घरी जाल तेव्हा त्याचा अभ्यास करा.

89 लक्षात घ्या, ते आता एकत्र येत आहेत. तुम्ही म्हणाल, "भाऊ ब्रॅन्हम, हे खरे आहे काय?" ते हर्मगीदोनच्या युद्धासाठी तयार होत आहेत, अगदी बरोबर तेच ते करणार आहेत. पाहिले? आणि आता ते त्यासाठीच एकत्र होत आहेत. त्यामुळेच आपल्याकडे संयुक्त राष्ट्रे आहेत, आणि सर्वकाही जे आहे. पाश्चिमात्य जग हे पूर्वेकडच्या जगाच्या विरोधात एकत्र येत आहेत, साम्यवाद आणि सर्वकाही ह्यांच्या विरोधात, सर्वकाही एकत्र संघटित होत आहे. त्यांना स्वतःला एकत्र संघटित करीत आहेत, आपण हे पाहत आहोत.

90 तसेच, ह्या सर्व राष्ट्रांचे एकत्रीकरण होत असताना, आपण ह्या जगामध्ये पाहतो की राष्ट्रीय चिन्हे दिसत आहेत, वेगवेगळ्या ठिकाणी भूकंप होत आहेत, वेगवेगळ्या गोष्टी संघटित होत आहेत; आणि जगाला एकत्र करीत आहेत, लोकांना एकत्र करीत आहेत, सर्व मंडळ्या एकत्र येत आहेत, आणि ह्या सर्व गोष्टी. आणि हे सर्व एकत्रीकरण चालू असताना, अजून एक एकत्रीकरण चालू आहे. आमेन! त्याच मुद्यावर मला तुम्हाला न्यायचे आहे.

91 देव त्याच्या वधूला एकत्र करत आहे. ती, पूर्व आणि पश्चिमेकडून, आणि उत्तर आणि दक्षिणेकडून, एकत्र येत आहे. संघटित होण्याचा एक समय आहे, आणि सध्या तो चालू आहे. ती कशासाठी एकत्र होत आहे? वर उचलले जाण्यासाठी. आमेन! देव तिला तयार करत आहे. होय महाशय, एकत्रीकरण! ती कशाबरोबर संघटित होत आहे? वचनाबरोबर! "कारण आकाश आणि पृथ्वी नाहीशी होतील, पण माझी वचने कधीच नाहीशी होणार नाहीत." कोणता संप्रदाय किंवा कोणी काहीही म्हणो, पण ती मात्र, प्रभू असे म्हणतो, ह्याच्याशी संघटित होत आहे. ती स्वतःला संघटित करीत आहे. ती तयार होत आहे. का? ती वधु आहे. हे बरोबर आहे. आणि ती स्वतःला वराबरोबर संघटित करत आहे, पाहा, आणि वर हा वचन आहे. "प्रारंभी शब्द होता, आणि तो शब्द देवासह होता, आणि तो शब्द देव होता. आणि तो शब्द देहधारी झाला आणि आम्हांमध्ये त्याने वस्ती केली."

92 आणि मंडळी आणि वधू आणि वचन इतके एकजीव होत आहेत, की ते वचनच वराचे कार्य करीत आहे. आमेन! तुम्ही हे पाहता काय? एक एकत्रीकरण! नाही आता पुढे,

“मंडळीला सामील होणे” हे नाही; *ह्यांतले* अजून जास्त काही नाही तर ह्या सर्वांपासून पळून ख्रिस्ताशी बांधले जाणे. पाहिले? हा एकत्रित होण्याचा समय आहे. देव, त्याच्या वधूला एकत्र करून तिला परत आणत आहे, अगदी बरोबर. त्याच्या वचनाचे शब्द एकत्र करीत आहे.

93 थेस्सलनीकरांस दुसरे पत्र, दुसरा अध्याय; म्हणते, हा पाचव्या अध्यायात म्हटले आहे, “जे संतजण झोपी गेले आहेत ते उठतील. आणि मग आपण त्याच्याबरोबर एकत्र होऊ (जे जिवंत आहेत ते जे मेले आहेत त्यांच्याबरोबर), आपण तेथे वर जाण्याअगोदर एकत्र होऊ.”, कारण वधू जेव्हा तेथे जाईल तेव्हा ती पूर्ण असेल. जे जिवंत आहेत, ते त्यांना स्वतःला वचनाबरोबर एकत्र करत आहेत, आणि ते जे गेले आहेत त्यांनी तसे अगोदरच केले आहे; आणि ते सर्व एकत्र येऊन, तेथे वर जाण्याअगोदर, एक महान एकत्रीकरण साधतील. आमेन!

94 साम्यवाद वाढायला हवा, ह्या इतर गोष्टी वाढायला हव्या आणि मंडळीने तेथे पलीकडे स्वतःला एकत्र करायला हवे, जेव्हा ते...आणि सर्व राष्ट्रे वैश्विक मंडळ्यांच्या परिषदेसाठी; आणि वधूने स्वतःला देवाच्या वचनाखाली संघटित करायला हवे. हे करण्यासाठी, देवाने खाली स्वर्गीय चिन्ह आणि इतर गोष्टी पाठविल्या आहेत, मंडळीला हे सिद्ध करून दाखविण्यासाठी, जसे त्याने राष्ट्रांना दाखविले आहे. आमेन.

95 देव; एकत्रिकरणाचा समय! होय महाशय. अरे बापरे! आता, हे लक्षात ठेवा की, वचनाचे एकत्रीकरण आहे (मागे पुन्हा एकत्र करणे) “जो विश्वास एकदा संतांना देऊ केला होता” त्याकडे परत आणणे. परत आणणे! की हे फक्त ह्याच दिवसात केले जाईल. ज्या वेळी हे व्हायला हवे ती आताच आहे. त्याच्यावर दुसऱ्या कुठेच प्रहार केला गेला नाही; ते सर्व सांप्रदायिक मनोरंजनामध्ये गेले होते. पण आता, ते सांप्रदायिक सपाट्याचे नाहीत कारण ही वेळ प्रत्येक जातीच्या पुरुष आणि स्त्रियांनी एकत्र येण्याची आहे, प्रत्येक वर्ण, प्रत्येक संप्रदाय, सर्वकाही पवित्र आत्म्याच्या बाप्तीस्म्याद्वारे ख्रिस्ताखाली आणि परत वचनाकडे.

96 मंडळीसाठी संघटित होण्याचा समय! अरे बापरे! संप्रदायाकडून बाहेर विखुरले गेलेले प्रत्येक वचन एकत्रित होत आहे जे कधी नायसिया, रोम येथे प्रथम मंडळीचे सुसंघटिकरण झाल्यानंतर ह्या संघटनांनी केले होते; आणि त्यांनी लुथरचे सुसंघटन केले, त्यांनी वेस्लीचे सुसंघटन केले, त्यांनी इतर सर्व मंडळ्यांचे सुसंघटन केले. आणि तसे करण्यासाठी त्यांना संप्रदायाचा स्वीकार करावा लागला आणि मग जेव्हा देवाने काही वेगळे पाठविले, त्याचा ते स्वीकार करू शकले नाही. त्यामुळे आतापर्यंत हे शक्य नव्हते. आणि देवाने शेवटच्या समयासाठी वचन दिले की, “वडिलांच्या विश्वासाची वधूकडे पुनर्रचना केली जाईल,” की हे अशा प्रकारे होईल, आणि ते ह्या समयाशिवाय दुसऱ्या कोणत्या समयात होणार नाही. पाहा किती महान चिन्ह स्वर्गांतून आहे की तो अग्निस्तंभ आपल्यावर आहे, आणि प्रभू येशू ख्रिस्ताची चिन्हे आणि आश्चर्यकर्मे होत आहेत. आणि जेव्हा तो आपल्याशी बोलतो, ते अगदी तंतोतंत जुळते आणि कधीच पडत नाही. आमेन! मग आपल्याला समजते की आपण कुठे उभे आहोत. संघटित होण्याच्या समयामध्ये!

97 आपण पाहतो राष्ट्रे एकत्र येत आहेत, आपण पाहतो जग एकत्र येत आहे, आपण पाहतो साम्यवाद एकत्र येत आहे, आपण पाहतो मंडळ्या एकत्र येत आहेत; आणि आपण पाहतो देव स्वतःला आपल्या मंडळीशी एकत्र करीत आहे, जोपर्यंत तो आणि मंडळी एक होत नाही तोपर्यंत. हालेलूया! तेथे असलेल्या त्या पिरॅमिडप्रमाणे. बरोबर! त्यांना एकत्र करत आहे; देव एकत्र करत आहे! *का?* ह्यापूर्वी, सुरुवातीच्या मंडळीच्या युगापासून,

अग्निस्तंभ लोकांमध्ये कधीच नव्हता. ज्या गोष्टी आपण आज पाहत आहोत त्या अगोदर, सुरुवातीच्या मंडळीच्या युगापासून त्यांनी कधीच पाहिल्या नाहीत. आणि हे तेव्हाच शक्य करण्यात आले जेव्हा देवाने सात शिक्के पाठविले आणि त्यांच्याद्वारे आपल्याला एक चिन्ह दिले, आणि त्याचे सात दूत स्वर्गांतून खाली पाठविले; ज्यांनी ते संप्रदायामध्ये विखुरलेले वचन परत आणून, पवित्र आत्मा खाली उतरावा म्हणून ते पुन्हा देवाच्या वचनाशी बांधले.

98 येशूने म्हटले, "जर तुम्ही माझ्यामध्ये आणि माझी वचने तुम्हांमध्ये राहिली तर तुम्ही जे काही मागाल ते तुम्हाला दिले जाईल." वधूला पुन्हा वचनाशी संघटित करणे, वचन देव स्वतः आहे. मंडळी आणि वचन, मंडळी आणि संप्रदाय नव्हे, मंडळी आणि वचन; वधू आणि वचन संघटित झाले आहेत. अरे बापरे! काय हे...पुनर्रचना कशाची? मूळ पेंटीकॉस्टल वडिलांचा विश्वास, जो लुथरन संघटनेने विखुरला होता. लुथरने स्वतःने नव्हे; लुथरने नव्हे, वेस्लीने नव्हे, त्या महान संस्थापकांनी नव्हे. पण ते गेल्यानंतर, तेथे एक मंडळी तयार झाली, आणि त्यांनी...त्यांनी तिचे काय केले, त्यांनी तिने तिच्यातून एक संघटना तयार केली. त्यांनी सांप्रदायिक शिक्षण वगैरे स्वीकारले आणि ते दूर पळाले. आणि आज त्यांच्याकडे पाहा, आता ते त्या वैश्विक मंडळ्यांच्या परिषदेमध्ये आले आहेत.

99 आता तुम्ही, शेवटल्या दिवसांत असताना पाहत आहा, आपण अशा गोष्टी पाहत आहोत ज्या पूर्वी कधीच घडल्या नाही. पाहा, हे देवाचे चिन्ह आहे आणि हे सर्व एकत्रीकरण हे समयाचे चिन्ह आहे. आता आपल्याला त्यावर काळजीपूर्वक पाहायचे आहे आणि खात्री करायची आहे की आपल्याला ते बरोबर कळाले आहे....ते संप्रदायासाठी, सत्य वचन सोडतात; देवाचे वचन घेण्याऐवजी ते सांप्रदायिक शिक्षण आणि निरनिराळ्या मनुष्यांचे विचार घेतात.

100 प्रगटीकरण 10 म्हणते, "त्या सातव्या दूताचा संदेश." आता लक्षात घ्या, तेथे बरोबर सात तुताऱ्या आहेत, आणि तेथे सात दूत आहेत जे त्या सात तुताऱ्या फुंकत आहेत. हेच आपण आता ह्यानंतर पाहणार आहोत. पण लक्षात घ्या, तेथे अगदी ठामपणे तेथे म्हटले आहे, "त्या दूताचा...," सातव्या दुताची तुतारी नव्हे पण त्या "सातव्या दूताचा संदेश." पाहा, तुतारीचा दूत नव्हे, संदेशाचा दूत! पाहा, त्या दूताने केवळ तुतारी फुंकली, त्या सातव्या दूताने, तुतारीचा दूत. पण हे म्हणते, "सातव्या दूताच्या संदेशाच्या दिवसांत," पाहा, जेव्हा त्याचा संदेश संपतो तेव्हा. पाहा तो मंडळीच्या युगाचा संदेश आहे. ह्या काळामध्ये, मग तो...तो संदेश, ती तुतारी नव्हे, आणि "ते देवाचे रहस्य (जे वचनात लिहिले आहे) पूर्ण होईल."

101 आता पाहा आपण कोणत्या दिवसात राहत आहोत! त्या शिक्याकडे पाहा, कसे त्यांनी देवाचे विखुरलेले वचन एकटविले, लुथर आणि दुसरे असे ते सर्व धर्मसुधारक कोणत्या परिस्थितींतून गेले; हे त्यांनी बायबलमध्ये दाखविले, ते कुठे होते, त्यांच्यांतील प्रत्येक मनुष्य अगदी बरोबर त्याच्या जागेवर, ते काय करतील आणि मंडळीचे काय होईल; तो काय करील आणि मंडळींचे काय होईल; आणि त्या सर्व गोष्टी ज्या तो सोडून गेला. आणि मग, ह्या शेवटल्या दिवसात, जेव्हा आपल्याला ह्याविषयी काहीच कल्पना नव्हती, आपल्याला घडणार असणाऱ्या काही गोष्टी अगोदरच सांगितल्या; आणि वृत्तपत्रांनीसुद्धा त्या पकडल्या, आणि तो सरळ खाली येऊन आपल्याला ह्या गोष्टी प्रगट करतो आणि रहस्ये बांधतो. आमेन! भावा, हे माझ्यासाठी खूप उदात्त आहे! की, जे माझ्यासाठी वचनाबरोबर जुळते. मी पर्वा करीत नाही काय-काय...किंवा मी पर्वा करतो की लोक काय बोलतात, विचार करतात, ते ठीक आहे पण माझ्यासाठी हे सत्य आहे, मी त्यावर विश्वास करतो.

102 त्या ज्ञानी मनुष्यांप्रमाणे जे बाबेलमधून खाली आले, आणि ते ओरडले, “यहूद्यांचा राजा जन्मला आहे तो कोठे आहे? आता ह्या क्षणी, तो पृथ्वीवर आहे. आम्हाला त्याला शोधले पाहिजे.” हे बरोबर आहे. आणि मी विश्वास करतो की ते येणे इतके जवळ आहे की मी सांगू शकतो, “आता वर येत आहे! मला मध्यरात्रीची हाक ऐकू येत आहे!” आमेन! आपण अगदी अंतिम समयात आहोत, अरे बापरे, ज्या तासात आपण जगत आहोत. लक्ष द्या. पाहिले?

103 काय दिवस आहे! काय वेळ आहे ज्यामध्ये आपण राहत आहोत, देवाचे हे महान रहस्य पूर्ण होत आहे; जे आपल्यापुढे देवाचे देवत्व मांडून, आपल्याला दाखवत आहे की हे काय आहे; कशाप्रकारे ह्या सर्व वादांनी, त्याला काहीतरी *असे* केले, आणि कोणीतरी त्याला *हे* केले, आणि कोणीतरी त्याला *ते* केले. परंतु देवाचा दूत खाली आला आणि त्याचे सर्व वाद बाहेर काढले, आणि त्यांतून सत्य बाहेर काढून ते सादर केले. आणि तेथे ते आहे, होईल तितके परिपूर्ण, दुसऱ्या कोणत्याच मार्गे तुम्ही ते करू शकत नाही. तेथे ते आहे, तेच तो आहे. पाहा, सर्पाचे बीज, ह्या–ह्या सर्व विभिन्न गोष्टी ज्या रहस्यमय स्वरूपात लोकांमध्ये होत्या. पाहिले? ते काय आहे?...हे कशाचे चिन्ह आहे? एकत्र होणे!

104 त्याने मलाखी 4 मध्ये काय सांगितले? पुनर्रचना करील! त्या मूळ पेंटीकॉस्टल विश्वासाची पुनर्रचना लोकांकडे करील, त्याच पेंटीकॉस्टल संदेशाने, तेच पेंटीकॉस्टल चिन्ह, तोच पेंटीकॉस्टल पुरावा, तोच देव, तेच सामर्थ्य, तीच शिकवण, सगळकाही अगदी तेच, त्याच अग्निस्तंभाच्या समर्थनाने ज्याने पौलाला दिमिष्कच्या मार्गावर खाली पाडले; त्याच गोष्टी ज्या त्याने त्या दिवसात केल्या त्या आपल्यामध्ये करत आहे. एकत्रीकरण!

105 आपण पाहतो की राष्ट्रे एकत्र होत आहेत, आपण पाहतो की जग एकत्र होत आहे, आपण पाहतो की मंडळ्या एकत्र होत आहेत. आपण पाहतो की वधू एकत्र होत आहे, वचनाशी एकत्र होत आहे. का? देव वचन आहे. आणि जसे वचन...जसा वर (जे वचन आहे), आणि वधू (जी वचन ऐकणारी आहे), ते एका संघात एकत्र होतात. ते एखाद्या लग्नाप्रमाणे एकत्र येतात. पाहा, ते एका लग्नासाठी तयार होत आहेत, आणि ते एक होतात. वचन तुम्ही बनता, आणि तुम्ही वचन बनता. येशूने म्हटले, “त्या दिवशी तुम्ही ते जाणाल. जो सर्वकाही पिता आहे, तो मी आहे; आणि जो सर्वकाही मी आहे, ते तुम्ही आहा; आणि तुम्ही सर्व जे आहा, तो मी आहे. त्या दिवशी तुम्ही जाणाल की मी पित्यामध्ये, पिता माझ्यामध्ये, मी तुम्हांमध्ये, आणि तुम्ही माझ्यामध्ये आहा.” पाहिले? त्या “दिवशी.” कोणत्या दिवशी? आजच्या ह्या दिवशी! आपल्याला देवाच्या महान लपलेली रहस्ये कळत आहेत. ओह, कसे मला ते आवडते!

106 ओह, विज्ञान आणि वचन ह्यांची तुलना जशी ते आज करत आहेत, तशी ते कधी करू शकले नाही. ते अगोदर हे करू शकले नाही. हे केवळ आताच आहे जेव्हा ते असे करू शकतात.

107 लक्ष द्या, त्याने म्हटले, “स्वर्गीय चिन्हे, स्वर्गीय चिन्हे.” विज्ञान, आणि राष्ट्रीय चिन्हे; आता त्यांच्याकडे आज, वर आकाशामध्ये महान चिन्हे आहेत, त्यांच्याकडे अंतराळवीर आणि सर्वकाही आहे. पण हे अंतराळवीर वैज्ञानिक जगाला काय करत आहेत? ते भीती आणतात. त्यांना माहीत नाही की कोणत्या वेळेला ते असे काहीतरी वर पाठवून खाली बॉम्ब टाकू शकतात, आणि आपण नाहीसे होऊ. पाहिले? आता तीच ती चिन्हे आहेत जी त्यांच्याकडे आहेत, स्वर्गातील भीतीदायक दृश्य. पाहिले? त्याच्याकडे ते आहेत, अण्वस्त्रे आणि सर्वकाही, सर्व प्रकारची चिन्हे.

108 तुम्ही पाहा कि त्यांनी त्या दिवशी एका करारावर सही केली की ते आता जमिनीवर बॉम्बस्फोट करणार नाही, पण आता ते खाली पाण्यात आणि जमिनीखाली, त्याचप्रकारे त्यांची चाचणी करणार आहेत. पाहिले? त्यांनी एक करार मंजूर केला कि, "आम्ही हे करणार नाही, जर तुम्ही म्हणता तुम्ही ते करणार नाही (पण तुम्ही घराच्या मागे जाऊन त्या मार्गाने ते कारणार आहा, जेव्हा आम्हाला माहीत आहे की तुम्ही तेथेही त्याच पद्धतीने ते करता)." पाहिले? तेथे केवळ एकही गोष्ट नाही, हे केवळ…त्यांच्यामध्ये विश्वास नाही, तेथे—तेथे काहीच नाही. तुम्ही…पाहिले? आणि प्रत्येकजण दुसऱ्याला भीत आहे. हे एक भीतीदायक चिन्ह आहे.

109 विज्ञान आणि मनुष्य आणि राष्ट्रे ह्यांनी आकाशामध्ये भीतीदायक चिन्हे तयार केली आहेत. हे अगदी बरोबर आहे. आता, एकमेकांना भीत आहेत. आणि तेथे एक स्वर्गीय चिन्ह आहे जे दिले आहे…आता पाहा, त्यांच्याकडे एक चिन्ह स्वर्गातही आहे, एक भीतीदायक चिन्ह, एक मनुष्य जो अंतराळयानात आहे; त्याच्याकडे अणू वस्त्र असू शकते आणि ते खाली फेकून पूर्ण राष्ट्राचा नाश करू शकतो. वर अंतराळात जाऊन तेथे उभे राहून. असे काहीच नाही जे त्यांना तसे करण्यापासून रोखू शकते.…त्यांना वाट्टेल त्यावेळी ते तसे नक्कीच करू शकतात. त्यांना वाटले तर ते, परंतु…आतापासून पंधरा मिनिटांत, तिला पूर्णपणे धुळीस मिळवू शकतात. आणि जे एखादा करू शकतो, तसेच दुसराही करू शकतो. तर मग तुम्ही पाहा, त्यांच्याकडे एक चिन्ह आहे पण त्या प्रकारचे चिन्ह त्यांना भयभीत करते.

110 ते एकत्र येत आहेत, त्यांचे सामर्थ्य एकत्र करत आहेत. एक मोकळे जग जे त्यांचे सामर्थ्य एकत्र करत आहेत. साम्यवाद त्याचे सामर्थ्य रशियाबरोबर एकत्र करत आहे. प्रत्येकजण; पण प्रत्येकजण दुसऱ्याला भीत आहे. पाहा, हे एक भीतीदायक चिन्ह आहे. हे बरोबर आहे. ती राष्ट्रीय चिन्हे आहेत.

111 पण मंडळीला एक स्वर्गीय चिन्ह मिळाले आहे, एक अंतराळवीर! आमेन! येशू ख्रिस्त, एका अग्निस्तंभाच्या स्वरूपात; जसा की तो जुन्या करारात होता, जसा की तो होता जेव्हा तो शौलाला दिमिष्काच्या वाटेवर भेटला, तोच येशू आज येथे आहे! आणि ते काय करते? काय ते भीती आणते? ते प्रेम आणते, एकमेकांना एकत्र करणारे. आमेन! एकमेकांसाठी एक भावना. ते देवाचे प्रेम आणते, ओह, जे, आपण ख्रिस्ताचे शरीर, आपल्याला एकत्र आणून वधूमध्ये एक करते. ते आता हेच करत आहे, हे महान संघटन जे देव…

112 ते स्वतःला एकत्र करत आहेत, एक समूह *येथे* दुसऱ्याबरोबर भांडण करण्यासाठी, एक समूह *तेथे* दुसऱ्याबरोबर भांडण्यासाठी. आणि येथे मंडळी त्यांच्यामध्ये उभी आहे; तुम्ही पाहा काय होते, ते त्यांच्याबरोबर एकत्र होईल. हे अगदी बरोबर आहे. पण, आता, आपल्याला दिसते की ते भीती आणि निराशा आणते.

113 पण मंडळी, वधू, ही एका देवाबरोबर संघटित आहे, एका आत्म्याखाली, देवाचा आत्मा, एका पवित्र संघटनामध्ये, देवाची एक पवित्र वधू अशी. हे बरोबर आहे, सर्व मिळून शरीराचे एकीकरण. ते शरीर जे वधू म्हणून वाट पाहत आहे, कारण ती वधू आहे जसे आपण स्वतःला वधू म्हणून संबोधितो. कारण वधूचे, मंडळीचे एकीकरण होण्याचा समय एकत्र येत आहे. त्यामुळे आपल्यामध्ये इतकं प्रेम उत्पन्न व्हायला हवे की आपण क्वचितच एकमेकांपासून दूर असू. हे बरोबर आहे. आम्ही केवळ…तुम्हाला लोकांना प्रार्थना करण्याची विनंती करायला लागणार नाही, तुम्हाला त्यांना देवाची स्तुती करण्यास विनंती करावी लागणार नाही, तुम्हाला त्यांना योग्य ते करण्यासाठी विनंती करावी लागणार नाही. ते त्याच्या इतक्या प्रेमात असतील की तेथे दुसरे काहीच नसेल.

114 तुम्ही ह्याविषयी काय विचार करता की एक छोटी मुलगी, एक खूप सुंदर अविवाहित तरुणी, जीचा एका तरुण देखण्या मनुष्याबरोबर विवाह होणार आहे ज्याच्यावर ती जीवापाड प्रेम करते, तिच्यासाठी हे तिच्या जीवनापेक्षा अधिक आहे, आणि तिला माहीत आहे की ते विवाहबद्ध होणार आहेत. जसजसा तो लग्नाचा दिवस जवळ येतो, ती छोटी मुलगी, मी तुम्हाला सांगतो की ती "येथेतेथे चालत राहते." पाहिले? ती केवळ सर्वकाही तयार करत असते, ती पूर्णपणे त्याला समर्पित होते. हे बरोबर आहे. सर्वकाही जे त्याला संतोषविते, तेच केवळ तिला करायचे असते. बरे, त्याचप्रकारे आज मंडळी असायला हवी, की आपले जीवन ख्रिस्ताद्वारे, देवामध्ये पूर्णपणे लपलेले असावे, पवित्र आत्म्याद्वारे तेथे पूर्णपणे बंद असे.

115 एक गोष्ट जी मी तुम्हाला येथे शिकविण्याचा प्रयत्न करत होतो की तुम्हाला ही चिन्हे आणि घडणाऱ्या विविध गोष्टींबद्दल सांगावे, मला ते करण्यासाठी वेळ मिळाला नाही; जर प्रभूची इच्छा असेल तर दुसऱ्या संदेशामध्ये मी सांगेन. पण एक गोष्ट आहे ज्यामध्ये मंडळी अजून कमी आहे. आणि आपल्याला त्यावर जाणे आहे, आणि आता मी त्याच्या अगदी कडेवर आहे. पाहिले? आपल्याला त्याकडे गेले पाहिजे...जर तुम्हाला ते करायचे असेल तर. जर तुम्ही ते केले नाही, तर बस तेवढेच आहे, तुम्हाला ते करायलाच हवे. कारण येथे पाहा, एकत्र येण्याची वेळ जवळ आहे, कारण देव मंडळीला त्या महान संघटनासाठी लग्नाकडे घेऊन जाताना वर उचलण्यासाठी एकत्र आणत आहे; जेव्हा देव आणि मनुष्य सर्वकाळासाठी एकत्र होतील; जेव्हा वेळेचे घटक सर्वकालाबरोबर एकत्र होतील.

116 ते एकदा पृथ्वीवर मनुष्याच्या पुत्राच्या स्वरूपात झाले होते. आणि त्याला हे सामर्थ्य येशू ख्रिस्ताच्या वधूकडे आणण्यासाठी आपले जीवन द्यावे लागले. आणि आता मंडळी स्वतःला ख्रिस्ताच्या वधूबरोबर एकत्र करत आहे. तिने स्वतःला मोकळे केले आहे, सर्व बेड्यांपासून दूर, स्वतःला तयार करीत आहे एकत्र येत त्यांच्यामध्ये संघटन होत आहे; ओह, प्रेम आणि आनंद, आणि पवित्र आत्मा त्यांच्यामध्ये फिरत आहे. अरे बापरे, काय वेळ आहे!

117 जसे आपण पाहतो, बदके तयार होत आहेत, आपण पाहतो हंस तयार होत आहेत, आपण पाहतो पशू...मधमाश्या तयार होत आहेत, आपण पाहतो ढग पावसासाठी तयार होत आहेत, आपण सर्वकाही पाहतो; कसे ते मोठ्या जोरासाठी स्वतःला एकत्र आणतात. आपण पाहतो की राष्ट्रांचे गट, राष्ट्रांचे एकत्र होऊन, स्वतःला साम्यवादामध्ये एकत्र करत आहेत. आपण त्यांना येथे पश्चिम जगामध्ये एकत्र होताना पाहतो. आपण पाहतो की मंडळी एकत्र होत आहे, ह्या सर्व दुसऱ्याही. तर मग हे खरोखर अशक्य आहे की दुसऱ्या कोणत्या वेळी हे असे असेल, वीस वर्षांपूर्वी, हे असे ह्या प्रकारे असणे अशक्य होते. दहा वर्षांपूर्वी असे नव्हते, हे आताच असे असायला हवे. पाहा, कारण हे सगळे वाद आणि सर्व ह्या ठिकाणी आले नव्हते.

118 आता जागे व्हा! लगेच, तुम्ही स्वतःला हलवा, आणि येथे पाहा आपण कोठे आहोत! आपण कोठे आहोत? त्या ज्ञानी पुरुषांप्रमाणे आपण त्याच्या वचनाच्या अगदी रेषेमध्ये आहोत, आणि प्रभुचा प्रकाश आपल्या मार्गामध्ये झळकत आहे. देवाला उच्चस्थानी गौरव असो. आणि देवाला गौरव असो ज्याने आपल्याला येशू खिस्त दिला, ज्यावर आपण प्रेम करतो आणि ज्याने आपल्याला ह्या जागी आणले आहे. आणि जसे आपण...आपण त्याचे लोक आहोत जे त्याच्या रक्ताच्या खंडणीने विकत घेतलेले असे आहोत.

119 अरे बापरे! जेव्हा एकत्र होण्याचा समय येतो, आपण पाहत आहोत, जसे आपण एकमेकांशी त्याच्या आत्म्याच्या कराराने एकत्र होत आहोत, आपण...हा त्याचा आत्मा

असेल काय? नक्कीच, हा त्याचा आत्मा आहे. का तो आहे? हे त्याचे वचन आहे. आणि तो...तो त्या वचनाचा आत्मा आहे. आणि जेव्हा तो वचनाचा आत्मा खाली तुम्हावर येतो आणि प्रगट करतो आणि येथे स्वतःला दाखवतो, काय तो तोच आत्मा आहे? तोच तो आहे जो अरण्यामध्ये मोशेसोबत होता! तोच तो आहे जो येशू ख्रिस्तावर होता! तोच तो आहे जो शौलाला दिमीष्काच्या रस्त्यावर भेटला! तो काल, आज आणि युगानुयुग सारखा आहे! आणि तो सारख्याच गोष्टी करतो.

120 आणि आपण राष्ट्रांना एकत्र आलेले पाहतो, आपण मंडळ्यांचे प्रमुख एकत्र आलेले पाहतो, आपण पाहतो की साम्यवाद एकत्र आलेला आहे, आपण पाहतो की सर्व वाद एकत्र येत आहेत, आपण ह्या सर्व गोष्टी पाहतो; आणि आता आपण पाहतो की वधू वचनाशी एक होत आहे. अरे बापरे! ही वेळ आहे की संतांनी उठून जे जिवंत आहेत त्यांच्याशी एक व्हावे, येशू ख्रिस्ताबरोबर युगानुयुग एक होण्यासाठी.

121 देव आपल्याला, प्रत्येकाला, येशू ख्रिस्ताबरोबर एक होण्यासाठी सहाय्य करो, आपण जे काही आहो ते सर्व समर्पित करू, आपण जे काही आहोत, सर्वकाही जे आपल्याकडे आहे, आपला संपूर्ण प्राण, देह आणि मन येशू खिस्ताला समर्पित करू, आणि त्या संघटित होण्याच्या समयाची वाट पाहू.

जेव्हा देवाची तुतारी वाजेल, आणि वेळ संपून गेलेली असेल,
आणि सार्वकालिक सकाळ होईल, तेजमय आणि शुभ्र
जेव्हा ख्रिस्तामध्ये मेलेले उठतील आणि वर एकत्र भेटण्यासाठी,
पलीकडच्या किनाऱ्यावर जमतील (जी वधू जिवंत आहे तिच्याबरोबर) यासाठी कि ते एकत्रितरीत्या उचलले जातील.

122 एकत्रीकरणाकडे पहा! देव मंडळीला त्याच्या वचनाबरोबर एक करत आहे, वचनाला मंडळीबरोबर, जेणेकरून ते दोघे एक व्हावे, "*हे* म्हणा, आणि तसेच होईल. *असे* करा आणि तेच होईल. बस्स तेच; तो मी आहे तुम्हापुढे, हा मी आहे जो हे सिद्ध करत आहे; तो मी तुमच्यासोबत आहे." ठीक आहे.

123 आपल्याला कळते की आता वेळ येत आहे जेव्हा तुतारीचा नाद होईल आणि जे तेथे मागे झोपलेले संतजण आहेत, ते आपल्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही; ते आपल्यावर अवलंबून आहेत (इब्री 11); आणि जेव्हा ते एकत्र येतील तेव्हा ते जिवंत असलेल्यांबरोबर एक होतील. मंडळी वचनाबरोबर एक होत आहे, मग मंडळी आणि वचन एक होऊन एक असे येत आहेत. मेलेले संत, जिवंत संतांबरोबर एक होण्यासाठी एकत्र येत आहेत; आणि सर्वजण एक होऊन कोकराच्या लग्नाच्या मेजवानीसाठी ख्रिस्ताबरोबर एक होण्यासाठी जात आहेत.

124 हा संघटित होण्याचं समय आहे आणि चिन्हे सर्व ठिकाणी दिसत आहेत. राष्ट्रांमध्ये चिन्हे, साम्यवादामध्ये चिन्हे, पश्चिम जगामध्ये चिन्हे, वैश्विक मंडळ्यांच्या परिषदेमध्ये चिन्हे. आणि आजच्या रात्री, पवित्र आत्म्याच्या कृपेने ते चिन्ह येथे आहे, आणि देवाचे वचन त्याची पुष्टी करून ते सत्य आहे हे दाखविते. आमेन! संघटित होण्याचा समय! संघटित होण्याच्या समयाचे चिन्ह!

आपण आपली डोके झुकवू या.

125 प्रभू येशू, जसे माझे गरीब हृदय आनंदाने उड्या मारत आहे, जसे मी शक्यता पाहतो, (माझी, मी एक मध्यम वयाचा मनुष्य), पण तरीही, तू ह्या युगात येताना, मी तुला पाहण्याची शक्यता पाहत आहे; की मी जिवंत असेन आणि तेथे उभा असेन, आणि

पाहीन जेव्हा त्या तुतारीचा नाद होईल, "जो मलीन आहे, तो मलीन असो. जो सदाचारी आहे, तो सदाचारी असो. जो पवित्र आहे, तो पवित्र असो." हे प्रभू देवा!

126 आणि आम्ही विचार करतो की आम्ही उभे असू, एका क्षणामध्ये, डोळ्याचे पाते लवते न लवते तोच, जेव्हा जगाला माहीत नसेल कि काय घडत आहे, पण अचानक, तू पाहशील की, तुझे प्रिय जे गेले होते ते तुझ्यापुढे तुझ्याबरोबर एक होण्यासाठी आले आहेत. आणि आम्ही एका क्षणांत बदलू, डोळ्याचे पाते लवते न लवते तोच, आणि एकत्रित वर घेतले जाऊ, प्रभूला अंतराळात भेटण्यासाठी आणि मग तेथे सर्वकाळ राहण्यासाठी त्याचबरोबर एक होऊ आणि त्यानंतर त्याच्या समक्षतेतून कधीच बाहेर जाणार नाही.

127 आज ही किती महान गोष्ट आहे हे प्रभू की आम्ही एका आत्म्यामध्ये एक आहोत हे आम्ही जाणतो. एक आत्मा, पवित्र आत्मा, ज्याच्या ताब्यामध्ये वचन आहे, तो आम्हांमध्ये आला आहे. आणि ही किती महान गोष्ट आहे, जगापासून वेगळे होऊन आम्ही स्वतःला येशू ख्रिस्ताबरोबर एक केले आहे हे किती सौभाग्य आहे. आणि हा विचार करणे कि एके दिवशी शाररीकरित्या, त्याच्या शरीरासारखे गौरवी शरीर धारण करून, आम्ही लग्नाच्या मेजवानीवर बसलेले असू आणि तेथे त्याच्याबरोबर लग्नामध्ये एक होऊ; एक पती आणि पत्नी असे सर्वकाळ राहण्यासाठी; निरंतर शाश्वतेमध्ये.

128 प्रभू देवा, लोकांसाठी हा केवळ एक दंतकथित विचार नसो तर हे इतके सत्य बनो की लोकांमध्ये अशी भूक आणि तहान उत्पन्न होवो की त्यांनी...त्यांची वृत्तपत्रे वाचताना,... पाहून...रेडिओ ऐकताना आणि बातम्या ऐकताना, हे पाहावे की हा संघटित होण्याचा समय आहे. चिन्हे झळकत आहेत.

129 प्रभू देवा, जसे आम्ही स्त्रियांविषयी बोललो, ते शेवटल्या दिवसांत काय करतील; मंडळी शेवटल्या दिवसांत काय करील; आणि मंडळयांचे समय काय असतील, आणि शिक्के काय असतील, ह्या सर्व इतर गोष्टी. आणि आम्ही पाहतो जसे नोहाच्या दिवसांमध्ये होते. आम्ही पाहतो जसे सदोम आणि लोटाच्या दिवसांत होते, जेव्हा देवाच्या दूताने मनुष्यरूपामध्ये स्वतःला प्रगट केले, ज्याने गोऱ्याचे मांस खाल्ले आणि गायीचे दूध प्यायले, आणि भाकर खाल्ली; आणि तेथे उभा राहून मागे काय होत आहे ते सांगितले. आणि येशूने म्हटले तीच गोष्ट मनुष्याचा पुत्र येण्याच्या वेळी घडेल.

130 प्रभू देवा, आम्ही पिरॅमिड पाहिले आणि कसे ते वरपर्यंत बांधले गेले, आणि कशाप्रकारे ह्या गोष्टी तेथे ठेवत गेलो; आणि आता आम्ही जाणतो की आम्ही अंतिम समयात असताना, मुख्य कोनशीला ह्याची वाट पाहत आहोत. देवाचा गौरव असो! आम्ही प्रार्थना करतो, पित्या, की तू आता लवकर लोकांना उठव आणि आम्हाला दैवी प्रेमाने आणि येशूसाठी आणि एकमेकांसाठी सन्मान करत एकत्र कर.

131 जर येथे कोणी असेल ज्यांच्याकडे ती आशा नसेल, तुम्ही देवाकडे तुमचे हात वर कराल आणि म्हणाल, "प्रभू देवा, मला तुझ्याबरोबर एक कर, मला तुझ्याबरोबर एक कर"? देव तुला आशिर्वादीत करो भावा. देव तुम्हाला आशिर्वादीत करो, आणि तुम्हाला, तुम्हाला; होय. "मला तुझ्याबरोबर एक कर प्रभू." होय! अरे बापरे!

राष्ट्रे तुटत आहेत, इस्राएल जागे होत आहे,

132 तेथे इस्राएलकडे पाहा, ते एकत्र संघटित आहेत. इस्राएल, स्वतःला एकत्र करण्यासाठी सर्व जगातून आले आहेत, त्यांना स्वतःला एक करण्यासाठी, आणि आता ते एक राष्ट्र आहे. ते एक संयुक्त राष्ट्र आहे, स्वतःच्या झेंड्यासाहित, स्वतःचे पैसे, स्वतःचे लष्कर, सर्वकाही; जर ते कधी असे होते तर ते आता आहेत. इस्राएल संघटित आहे, रोम संघटित आहे, मंडळी संघटित आहे. आणि वधू एक होत आहे, आमेन; आणि त्या

येणाऱ्या महान संघटणासाठी. हे काय आहे? हे सर्व त्या चिन्हाकडे जात आहे, ते महत्वाचे ठळक चिन्ह, येशू आणि त्याची वधू संघटित होऊन एक होत आहे.

133 पित्या, देवा, ह्या मागण्या कबूल कर ज्या मी ह्या लोकांसाठी मागत आहे, आणि आम्ही हृदयात आणि आत्म्यात एक होवो, त्यांनी त्यांचे हात वर केलेले असताना, ज्यांची हीच इच्छा आहे. प्रभू देवा, आम्हाला शुद्ध कर आणि आम्हाला तुझे कर; प्रभू हे मान्य कर. मागणे हे एवढेच माहीत आहे आणि आम्ही करतो. आणि मग तू म्हटले आहेस जर आम्ही मागितले आणि विश्वास केला, तर आम्हाला ते मिळेल; मी तशी अपेक्षा करतो प्रभू. मी तुझे आभार मानतो येशू ख्रिस्ताच्या नावामध्ये. आमेन.

मी त्यावर प्रेम करतो, मी त्यावर प्रेम करतो,
कारण त्याने प्रथम माझ्यावर प्रेम केले,
आणि माझे तारण विकत घेतले
कालवरीच्या झाडावर. (आमेन. अरे बापरे!)

पाहा, वर येत आहे!
मला मध्यरात्रीची हाक ऐकू येत आहे!
जर आपण पकडून राहिले, आपण ओरडून वर जाऊ,
आणि वर आकाशात त्याला भेटू.

जागृत राहा आणि प्रार्थना कर, माझ्या भावा,
नाहीतर मुकुट घेईल कोणीतरी तुझा,
कारण कोमट आणि मागे फिरणारा
नाही घालणार लग्नाचा झगा.

134 हे बरोबर आहे. ह्या मध्यरात्रीच्या हाकेसाठी आपण तयार होऊया. तुम्ही विचार करत नाही अशा वेळी येत आहे. एक हाक ऐकू येईल, अविश्वासणाऱ्या जगासाठी नाही, ती एक गुप्त असेल. पण विश्वासणारे जे त्याची वाट पाहत आहेत, तुम्हाला तारे एका रेषेत दिसतात का? पाहिले? त्यांने काय केले? अगदी तेच जे त्याने पहिल्या वेळी केले. पाहा, येथे आपण आहोत, चिन्हे येत आहेत.

आपण त्याच्या कृपापूर्ण येण्याची चिन्हे दिसताना पाहत आहोत,
पाहा अंजिराची पाने आता हिरवी होत आहेत;
राज्याची सुवार्ता सर्व राष्ट्रांत पसरली आहे;
आणि आपण जवळ आहोत, अंत दिसत आहे.

मग आनंदाने आपण, दूर त्याच्या कृपापूर्ण येण्याचा संदेश आपण
दूर गाजवू,

135 काय हे बरोबर आहे? ओह, त्याच्या कृपापूर्ण दिसण्याचा संदेश गाजवा. आपल्याला तेच करायला हवे. सर्वांना सांगा, "तयार व्हा, देवाला भेटण्याची तयारी करा." आमेन! मी त्याच्यावर प्रेम करतो. ओह, मी त्याच्यावर किती प्रेम करतो. आता, आपण आपल्या पायावर उभे राहूया. आपण एकमेकांचा निरोप घेत असता, आजूबाजूला जाऊन कोणाबरोबर तरी हस्तांदोलन करा, आणि म्हणा:

आपण भेटू तोपर्यंत! (आता, हस्तांदोलन करा)…भेटू तोपर्यंत!
आपण येशूच्या चरणाशी भेटू तोपर्यंत;
आपण भेटू तोपर्यंत!…

लक्षात ठेवा तुम्हाला कदाचित बोलावणे येईल. आपली पुढची भेट कदाचित त्याच्या चरणापाशी होईल.

ओह देव तुमच्याबरोबर असो आपण पुन्हा भेटू तोपर्यंत!

136 आता, फक्त विचार करा, आपण पुन्हा भेटण्याआगोदर; आपण रविवारी सकाळी किंवा बुधवारी रात्री पुन्हा भेटण्याआगोदर, कदाचित असे होईल की...पहिली गोष्ट तुम्हाला माहीत आहे, कोणीतरी हरवले असेल. हे हरवलेले असतील, आणि ते गेलेले असतील. ओह, तुमचे पती हरवले असल्याचा विचार करा, किंवा तुमची पत्नी हरवली असल्याचा, आणि—आणि योहानाची पत्नी हरवली असल्याचा, आणि—आणि—आणि येथे तुमची मुले हरवले असल्याचा. सर्व झाले (काय घडले?), मग तुम्ही मागे राहिलेले असाल!

ओह, किती दुःख आणि रडणे असेल जेव्हा हरवलेल्यांना त्यांचे प्राक्तन सांगितले जाईल,
त्यांनी दगडांना आणि पर्वतांना हाक मारली, (जसे इस्राएल, शहरात परत जाताना, त्या मंदिराकडे.)
त्यांनी प्रार्थना केली पण त्यांच्या प्रार्थनांना खूप उशीर झाला होता. (त्यांनी संदेश नाकारला.)

137 ओह, भावा, तसे कधीच करू नको. तुम्ही जे काही कराल, त्या ध्येयासाठी शूर असे उभे राहा! होय महाशय!

138 आता, आपण भेटू तोपर्यंत आपण असे करू:

येशूचे नाव तुमच्याबरोबर घेऊन जा,
प्रत्येक चिंतेची एक ढाल म्हणून,
जेव्हा मोह तुमच्याभोवती जमतात, (तुम्ही काय करता?)
त्या पवित्र नावाचा प्रार्थनेमध्ये श्वास घ्या.

मौल्यवान नाव, ओ किती मधुर!
पृथ्वीची आशा आणि स्वर्गाचा आनंद;
मौल्यवान नाव, ओ किती मधुर!
पृथ्वीची आशा आणि स्वर्गाचा आनंद.

139 आपण गुणगुणत असताना, आपली डोके खाली झुकवू या.

येशूच्या नावापुढे झुकत असताना,
लोटांगण घालत त्याच्या चरणाशी पडतो,
राजांचा राजा स्वर्गामध्ये...त्याला मुकुट घाला,
जेव्हा आपला प्रवास संपेल. (एक दिवस ते होईल.)

मौल्यवान नाव, मौल्यवान नाव, ओ किती मधुर!

आपण पुन्हा भेटेपर्यंत देव तुमच्याबरोबर असो.

पृथ्वीची आशा आणि स्वर्गाचा आनंद;
मौल्यवान नाव, ओ किती मधुर! किती मधुर!
पृथ्वीची आशा आणि स्वर्गाचा आनंद.

**_संघटीत होण्याची वेळ आणि चिन्ह_** MAR63-0818

(The Uniting Time And Sign)

हा संदेश, भाऊ विल्यम मिरीयन ब्रॅन्हम ह्यांच्या द्वारे, मूळ स्वरूपात इंग्रजीमध्ये, रविवारी संध्याकाळी, 18 ऑगस्ट 1963 साली, ब्रॅन्हम टॅबरनॅकल जेफरसनविले येथे, इंडियाना, संयुक्त राज्य, अमेरिकेत प्रचार केला गेला, जो चुंबकीय टेप रेकोर्डिंग मधून घेतला गेला आहे आणि इंग्रजीमध्ये विस्तृत स्वरुपात छापला गेला आहे. हे मराठी भाषांतर, व्हॉइस ऑफ गॉड रेकॉर्डिंग्स ह्यांनी छापले आहे आणि त्याचा वाटप करण्यात आला आहे.

MARATHI

©2017 VGR, ALL RIGHTS RESERVED

VOICE OF GOD RECORDINGS, INDIA OFFICE
19 (NEW NO: 28) SHENOY ROAD, NUNGAMBAKKAM
CHENNAI 600 034, INDIA
india@vgroffice.org

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org

**<u>छपाईच्या हक्काची सूचना</u>**

संपूर्ण हक्क राखीव आहेत हे पुस्तक घरातील प्रिंन्टरवर स्वतःच्या उपयोगा करिता, किंवा दूस-यांना मोफत देण्या करिता, येशू ख्रिस्ताची सुवार्ता प्रसार करण्या करिता एक साधन म्हणून छापू शकता येईल. हे पुस्तक विकू शकता येणार नाही. किंवा फार मोठया प्रमाणावर प्रती काढण्यास मनाई आहे. किंवा वेबसाईडवर प्रसार करण्यास मनाई आहे. कोणत्याही प्रकारच्या पुर्नःप्राप्ति प्रणाली मधून नक्कल करण्यास मनाई आहे. दूस-या भाषेत भाषांतर करण्यास किंवा रक्कम गोळा करण्यास मनाई आहे. या सर्व गोष्टीं करण्याकरिता Voice of God Recodings यांची लिखित परवानगी घेणे आवश्यक आहे.

अधिक माहिती करिता किंवा इतर उपलब्ध गोष्टीं करिता कृपया संपर्क साधा.

VOICE OF GOD RECODINGS
P.O. Box 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A
www.branham.org.